# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **CS2021**

# B

**Total Que.: 80**
**Marks : 200**
**Time : 2 hrs.**


**Mob. No. 9923262977**
**Date : 05/12/2021**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा – 2021**
**विषय : — (C-SAT) [222]**

## सूचना

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ८० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा–क्रमांक हया चौकोनांत न विसरता **काळया बॉलपेनने** लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे **श्रेयस्कर** आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

५. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

६. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**."

**प्रश्न क्रमांक 1 ते 4 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

वर्ल्ड - वाइडफंड फॉर नेचर (डब्ल्युडब्ल्युएफ) अर्थात जागतिक वन्यजीव निधीतर्फे नुकताच प्रस्तुत झालेला 'लिव्हिंग प्लॅनेट' अहवाल हा मानवी प्रगतीची, क्रियाशिलतेची किंमत आसमंतातील प्राणिमात्रांना किती भयानक प्रकारे चुकावावी लागत आहे. यावर प्रकाशझोत टाकणारा आहे. या अहवालानुसार, 1970 ते 2014 या काळात जगातील एकूण पृष्ठवंशीय प्राण्यांपैकी सरासरी 60 टक्के नष्ट झाले आहेत. यात मासे, पक्षी, उभयचर, सरपटणारे, संस्तन अशा सर्व घटकांचा समावेश आहे. गोडया पाण्यातील जवळपास 80 टक्के जीवन संपुष्टात आले आहे. औद्योगिकीकरण, भांडवलीकरण, आर्थिक प्रगती अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या मानवी क्रियाशीलतेचा सर्वाधिक फटका लॅटिन अमेरिका खंडाला बसला असून, तेथील जवळपास 90 टक्के वन्यजीवन संपुष्टात आल्याची धक्कादायक माहिती हा 148 पानी अहवाल पुरवतो. वास्तविक पृथ्वीवर एकपेशीय जीव उद्याला आल्यापासून किमान पाचेक वेळी तरी पृथ्वीने उत्क्रांती ते विलोपन अशी महाचक्रे अनुभवली आहेत. पृथ्वीतलावरून एखादी प्रजाती नष्ट होणे यात असामान्य असे काहीच नाही. किंबहुना, विलोपन हा चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांतिवादाच्या अभ्यासाचा गाभा होता. काही प्रजाती विलुप्त का होतात नि काही उत्क्रांत कशा होत जातात याविषयीच्या सखोल अभ्यासातून सजीवांच्या अनुकूलनाचा (सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट) सिध्दान्त त्यांनी मांडला. डायनोसॉरसारख्या महाकाय आणि सर्वव्यापी प्रजातीही विविध कारणांस्तव नष्ट झालेल्या आहेत. मानवाचीही त्याच दिशेने वाटचाल सुरू असल्याचे काही विश्लेषकांना वाटते. पण मुद्दा हा नाहीच. आजवरच्या विलोपनांबद्दल पारिस्थितिक घटकांना जबाबदार धरण्यात आले होते. ताज्या अहवालानुसार मात्र या सर्व प्रजातीच्या विनाशासाठी एक आणि एकच प्रजाती कारणीभूत आहे आणि ती म्हणजे मानव ! मानवी अतिक्रमणांमुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास आक्रसत आहेत. याविषयीच्या बातम्या तशा तित्याच्या झाल्या आहेत. पण मानवाच्या प्रगतीपायी इतक्या अल्प कालावधीत केवळ सजीवच नव्हे, तर पारिस्थितिक संस्थाच नामशेष होऊ लागल्याची जाणीव इतक्या भयानक पध्दतीने पूर्वी कधीही झाली नव्हती.

खरोखरच आपण मानव इतके विध्वंसक, बेफिकीर आहोत ? वन्यजीव निधीच्या मुख्याधिकारी तान्या स्टील यांच्याच परखड शब्दांत मांडायचे झाल्यास, आपण पृथ्वी नष्ट करीत आहोत हे पूर्णपणे माहीत झालेली पहिलीच पिटी असू, पण आपण अशी शेवटची पिढी आहेता, जी याबाबत काही तरी करू शकेल ! हा केवळ काही टक्के सजीवांचा किंवा परिसंस्थांचा प्रश्न नाही. हा मानवी भविष्याचा प्रश्न आहे. उदा. समुद्रातील माशांच्या पोटात मोठया संख्येने प्लास्टिकचे अंश आढहू लागले आहेत, जे माशांसाठीच नव्हे, तर ते खाणाऱ्या मानवासाठीही घातक ठरू शकतात. आज जगातील जवळपास 400 कोटी लोकांचा मासे हा प्रमुख पोषणस्रोत आहे. जगातील जवळपास एकतृतीयांश पिकांचे परागण पक्षी आणि प्राण्यांव्दारे होते. आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत परिसंस्था नष्ट होऊ लागल्या आहेत. या खंडांना दुष्काळ आणि टंचाई सर्वाधिक सतावत आहे हा योगायोग नाही. शेती नष्ट झाल्यामुळेच मध्य अमेरिकेतून निर्वासितांचे लोंढे अमेरिकेत येऊ लागले आहेत. 'लिव्हिंग प्लॅनेट' अहवालानुसार अधाशी मानवी उपभोग हा परिसंस्थांच्या विध्वंसाच्या मुळाशी आहेत. त्या त्या वेळी करार होतात पण या करारांतून बाहेर पडण्यातच विशेष प्रगत देशांना रस असतो क्योटो, रिओ ते पॅरिस असे हे अपयश आणि नैराश्याचे चक्र आहे एक वेळा अण्वस्त्र किंवा क्षेपणास्त्र प्रसारबंदी व्यापार करार, दहशतवादविरोधी लढा अशा कारणांसाठीच्या जागतिक परिषदा निष्फळ ठरल्या जितके नुकसान होणार नाही, तितके नुकसान पर्यावरण आणि परिसंस्थांच्या बाबतीत आपली उदासीनता आणि आपल्या दिशाहीनतेतून केल्या जाणाऱ्या डोळेझाकीमुळे होणार आहे.

1. वरील उताऱ्यातील 'लिव्हिंग प्लॅनेट' अहवाल कोणत्या बाबीवर प्रकाश टाकतो ?
   अ) सजीव सृष्टीच्या विनाशासाठी मानवच जबाबदार आहे
   ब) पृथ्वीवरील सजीवसृष्टीला विलोपनास सामोरे जावे लागत आहे
   क) मानवाने आपल्या क्रियाशिलतेतून केलेली प्रगती
   1) अ  2) ब  3) क  4) अ, ब, क

---

2. परिसंस्था कोणत्या कारणांमुळे नष्ट होत आहे ?
   अ) मानवाने केलेल्या सर्वच क्षेत्रातील प्रगतीमुळे
   ब) औद्योगिकीकरण वाढल्यामुळे
   क) मानवाच्या निसर्गाप्रती असलेल्या बेफिकिर भावनांमुळे
   ड) वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासात मानवाने अतिक्रमण केल्यामुळे
   1) अ, ब  2) अ, क  3) क, ड  4) ब, क, ड

---

3. सजीव सृष्टीबाबत खालीलपैकी कोणते विधान / विधाने योग्य आहेत ?
   अ) सजीव सृष्टीच्या विलोपनास पारिस्थितिक घटक कारणीभूत असतातच असे नाही
   ब) सर्वच स्तरांतील परिसंस्थाच्या विध्वंसासाठी मानवाची आधाशीवृत्ती कारणीभूत असतेच असे नाही
   1) अ  2) ब  3) अ, ब  4) यापैकी नाही

---

4. वरील लेखाची मध्यवर्ती संकल्पना कोणती ते ओळखा ?
   अ) पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक आहे
   ब) पर्यावरण व परिसंस्थाबाबत केलेल्या डोळे झाकीमुळे होणारे नुकसान
   क) मानवाच्या प्रगतीमुळे परिसंस्था नष्ट झाल्या आहेत
   1) अ  2) ब  3) क  4) अ, ब, क

---

**प्रश्न क्रमांक 5 ते 8 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

ज्या भूमीत आपण कित्येक वर्षे राहत आहोत त्याच भूमीत आपले नागरिकत्व सिध्द करावे लागण्यासारखे वेदनादायी दुसरे काही नाही. आसामातील लाखो नागरिकांना या वेदनांना सामोरे जावे लागत असून तब्बल 40 लाख जणांच्या पायाखालची भूमीच शब्दश: गायब झाली आहे. याचा अर्थ त्यांच्या नागरिकत्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे प्रमाण आसामच्या

एकूण लोकसंख्येच्या 12 टक्के इतके आहे. हेसर्व होण्यामागचे कारण सर्वोच्च न्यायालयाने 2013 साली दिलेला आदेश या आदेशानुसार आसामातील सर्व नागरिकांची तपासणी करणे अत्यावश्यक बनले. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला खरा परंतु त्याच्या पूर्ततेसाठी राज्य सरकारने या संदर्भात गोळाबंद अशी यंत्रणा तयार केली नाही. परिणामी नेहमीच्या सरकारी खात्यानुसार अर्ध्या कच्च्या पध्दतीने हे काम झाले जे झाले ते भयंकर म्हणावे असे आहे. म्हणजे पाच भाऊ असतील तर त्यापैकी दोघांचा रहिवासी, पालकत्वाचा पुरावा आमन्य पती, पत्नी आणि पोराबाळांपैकी बायकोच्याच नागारिकत्वावर प्रश्नचिन्ह का ? तर ती ज्या गावची आहे त्या गावच्या सरापंचाने तपशीलच अयोग्य सादर केला म्हणून अन्य कोणाच्या बाबतीत मतदार ओळखपत्र वगरे आहे. पण पणजोबांच्या नावाच्या पतशिलात काही गोंधळ आहे. इतकेच नव्हे तर या देशाचे माजी राष्ट्रपती फक्रद्दिन अली अहमत यांच्या भावाचे कुटुंबीयदेखील या यादीनुसार अभारतीय ठरतात याचा अर्थ यांदीत नसलेले सर्वच्या सर्व निर्दोषच आहेत अशा निश्तिच नाही. परंतु प्रश्न आहे तो नागरिकत्व ठरवण्याच्या या अत्यंत सदोष पध्दतीबाबत तिचा कोणताही विचार न करता सरकारने ही प्रक्रिया सुरू ठेली त्यातून उदभवलेला वाद भयानक म्हणावा लागेल

यातील सर्वात आक्षेपार्ह बाब म्हणजे आपले नागरिकांवरच टाकणे. त्यासाठी विविध टप्पे तयार केले गेले. ठिकठिकाणी आवश्यक ती केंद्रे स्थापन केली. म्हणजे हे कसे करावयाचे याची चौकट उभारली पण कोणत्या निकर्षाच्या आधारे यातील तपशिलाचा अर्थ काढायचा याची समान पध्दत तयार केली नाही परिणामी सर्व कागदपत्रे सादर करूनसुध्दा अनेक जण आपले भारतीयत्व सिध्द करू शकले नाहीत. अंशाची संख्या 40 लाखांहून अधिक इतकी प्रचंड आहे. म्हणजेच नियमानुसार हे 40 लाख भारताचे नागरिक नाहीत. तरीही या 40 लाखांची वर्गवारी अशी का, याची कारणे दिली जाणार नाहीत असे सरकार म्हणते. म्हणजे एखादा भारतीय नाही, असे सरकार ठरवणार पण ते कशाच्या जोरावर ते सांगणार नाही. सरकारची माहिती इतकी ठाम, निर्दोष आहे असे या सरकारांना वाटत असेल तर या सगळयांना अभारतीय ठरवण्याची तरी हिंमत त्यांनी दाखववी तसे करता येणे शक्य नाही. आता या 40 लाखांना पुन्हा एकदा आपले नागरिकत्व सिध्द करायची संधी दिली जाईल. त्यासाठी 30 सप्टेंबर ही मुदत असेल. गेल्या चार वर्षाच्या मुदतीत हे नागरिक आपले नागरिकत्व सिध्द करू शकले नाहीत किंवा त्यांनी करूनही ते सरकारने मानले नाही. हे असे का, हे सरकार सांगणार नाही आणि परत मुदत वाढवून पुरावे द्या असे म्हणणार हे सारेच अनाकलनीय ठरते या राज्यात इंग्रजांच्या काळातच पहिले मोठे स्थलांतर घडवले गेले विविध कामांसाठी म्हणून ब्रिटिशांनी शेजारच्या बिहार वगरे राज्यातून मोठया प्रमाणावर मजुरांना आसामात नेले. हे सर्व आता आसामातच स्थायिक झाले. स्वातंत्र्यानंतर 1951 साली पहिल्यांदा नागरिकत्वासाठी तपासणी झाली. त्यानंतर आता दरम्यान ऐंशीच्या दशकात झालेल्या आसाम विद्यार्थी संघटनेच्या आंदोलनात या स्थ्लांतरितांना चांगलाच फटका बसला. त्यावेळी हे आंदोलन आसामी आणि बिगर आसामी यांच्यात झडले याचा अर्थ राज्य म्हणून आसाम हे कायमच स्थलांतरितांसाठी आकर्षक आणि त्याच वेळी प्रक्षोभकारी ठरलेले आहे. तेव्हा अशा राज्यात नागरिकत्वाचा मुद्दा हा अधिक जबाबदारीने हाताळण्याची गरज आहे. ही जबाबदारीची जाणीव दाखवण्याऐवजी केंद्र आणि राज्यातील सरकारांनी आसामी आणि बिगरआसामी या भेदास आणखी एकाची जोड दिली.

ती म्हणजे हिंदू आणि मुस्लिम हा प्रश्न स्फोटक ठरतो तो यामळे निर्वासित हा धर्म पाहून देश सोडत नाही. तो जेथे जगण्याची संधी आहे अशा ठिकाणाच्या शोधात असतो धर्म हाच निर्वासितांसाठी स्थर्याचा मुद्दा असता तर सीरिया लिबियातील निर्वासितांनी सौदी अरेबिया वा अन्य इस्लामी देशांत आसर शोधला असता पण हे सगळे निर्वासित भिन्न धर्मीय असूनही युरोपीय देशांत जातात कारण तेथे जगण्याची हमी असते आणि धर्माच्या मुद्द्यावर आपणास वेगळे पाडले जाणार नाही याची खात्री असते फाळणी झाली तेव्हा पूर्व पाकिस्तानातील अनेकांनी भारतात आसरा घेतला या अशा किती निर्वासितांना आपण पोसणार हा गंभीर प्रश्न आहे हे मान्यच किंबहुना बांगलादेश युध्दाच्या वेळी याच निर्वासितांच्या मुद्द्यावर इंदिरा गांधी यांनी त्या देशाच्या वतीने हस्तक्षेप केला हा इतिहास आहे. परंतु आता हाताळणी सुरू आहे. हे सर्व निर्सासित असले वा नसले तरी बंगाल बोलतात निर्वासित मग तो देशातल्याच एका राज्यातून दुसऱ्यात गेलेला असो, जगण्याच्या रेटयामुळे स्थानिक भाषा बोलतो त्यास ते करावेच लागते. अशा वेळी केवळ तो आसामी भाषेप्रमाणेच बंगालीही बोलतो आणि मुख्य म्हणजे तो मुसलमान आहे म्हणून त्यास निर्वासित ठरवणे हे घोर पाप ठरते. आसाम सरकारकडून सध्या ते बिनदिक्कतपणे सुरू आहे.

5. प्रस्तूत लेखामध्ये असाम सरकारच्या नियमानुसार 40 लाख रहिवासी भारताचे नागरिक नाहीत तर या सर्वांना अभारतीय ठरवण्याची हिमत सरकारकडे का नाही ?

अ) नागरिकत्व निश्चित सिध्द करता येत नाही

ब) नागरिकत्व सिध्द करण्यासाठी सदोष पध्दतीचा वापर केला

क) कारण सरकारकडे त्याबाबतचा व्यवस्थित दस्ताऐवज नाही

अ) ब 2) क 3) ब, क 4) अ, ब, क

6. लेखक असाम सरकारच्या कोणत्या कार्यवाहीबाबत नाराज आहे ?

अ) एखादी व्यक्ती, असामी, बंगाली बोलते म्हणून तो निर्वासित ठरवणे

ब) एखादी मुसलमान व्यक्ती बंगाली बोलतो म्हणून तो निर्वासित ठरवणे

क) आसामातील प्रत्येक मुसलमान हा बंगालादेशीच आहे हे टरवल्यामुळे

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) अ, ब, क

7. खालील विधानांपैकी कोणते विधान / विधाने सदोष आहे ?

अ) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आसाम मधील सर्व नागरिकांचे नागरीकत्व तपासून पहावे

ब) आसाम सरकारने नागरिकत्व ठरवण्यासाठी सदोष पध्दतीचा अवलंब केला

क) आसाम सरकारच्या यादित समाविष्ठ नसलेल्या नागरिकांचे नागरिकत्व सदोष निश्चितच नाही

1) अ, ब 2) ब, क 3) क 4) यापैकी नाही

8. लेखकाच्या मते सर्व निर्वासित भिन्न धर्माचे असून सुध्दा युरोपीय देशात जातात कारण

1) युरोपीय देशात धर्माला महत्व नाही 2) युरोपीय देशात सर्व धर्मामध्ये ऐक्य आहे

3) निर्वासितांना युरोपिय देशात स्थैर्य दिले जाते 4) युरोपीय देशात जीवन जगण्याची खात्री असते

**प्रश्न क्रमांक 9 ते 12 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

आपल्याकडील अन्य अनेक मुद्दयांप्रमाणे लैंगिकता या विषयाबाबतची उच्चकोटीची सामाजिक दांभिकता शरीर भावना म्हणजे जणू पापच असे शहाजोग आपले सामाजिमक वर्तन असते. वरून कीर्तन आतून तमाशा हे अशा समाजाचे व्यवच्छेदक लक्षण तेव्हा अशा समाजात समलैंगिकतेस अनैसर्गिक, गुन्हेगार, विकृत आदी ठरवले गेले नसते तरच नवल खरे तर एखाद्या व्यक्तीने आपला कोणता अवयव कशा प्रकारे वापरावा हा पूर्णपणे खासगी मुद्दा आहे जोपर्यंत त्यांच्या कोणत्याही कृत्याचा तिसऱ्या कोणत्याही व्यक्तीस उपद्रव होत नाही तोपर्यंत त्याच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर बाधा आणण्याचा अधिकार समाजास नाही परंतु हे साधे तत्व आपणास नामंजूर होते त्यामुळे समलैंगिकतेस आपण गुन्हेगार ठरवत आलो. त्यातून फावले ते फक्त पोलीस आदी यंत्रणांचे कोणाच्याही शयनगृहात शिरण्याचा अधिकार या सामाजिक वृत्तीमुळे पोलिसांनी स्वत:कडे घेतला आणि आपले खिसे तेवढे भरले. कारण समाजमान्यता (?) नाही म्हणून व्यक्ती आपल्या गरजा भागवणे थांबवतात असे नाही. त्यामुळे समलैंगिकतेस गुन्हेगार ठरवण्याऱ्या भारतीय दंड संहितेतील कलम 377 मध्ये सुयोग्य बदल होणे गरजेचे होते तेवढी सांस्कृतिक हिंमत आपल्या सरकारात नाही कारण सरकारनामक यंत्रणा या बहुमतवादी असतात ते चालवणारे बहुमताने निवडून आलेले असतात म्हणून बहुमतास सुखावेल तेच करण्याकडे त्यांचा बौध्दिक कल असतो परंतु एखाद्या निर्णयास वा परंपरेस बहुमत आहे म्हणजे त्यातून त्या निर्णय वा परंपरेची योग्यता / अयोग्यता सिध्द होत नाही सामाजिक विचारांचा प्रवाह ज्या समाजात क्षीण असतो तो समाज बहुमत या तकलादू समाजाचा आधार घेतो. म्हणूनच अशा समाजात 'पाचामुखी परमेश्वर' वगैरे छापाचे बौध्दिकदृष्टया अत्यंत कमकुवत वाक्यप्रचार रूढ होत गेले. सर्वोच्च न्यायालयाचा कलम 377 बद्दलचा निर्णय या मुद्दयावरदेखील स्वागतार्ह ठरतो 'बहुमतवादी दृष्टीकोन आणि प्रचलित नैतिकता हे घटनादत्त अधिकारांपेक्षा मोठे नाहीत' हे न्यायालयाचे या संदर्भातील विधान तर जमेल तेथे फलक करून लावावयास हवे कारण बहुमताचे म्हणजे सगळेच बरोबर असे मानण्याचा प्रघात सध्या आपल्याकडे पडलेला आहे. तेव्हा लैंगिकतेसारख्या पूर्णपणे वैयक्तिक मुद्दयांवर बहुमत / अल्पमत, नैसर्गिक / अनैसर्गिक ठरवणार कोण ? असे विचारत या प्रश्नाचे उत्तर सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल देतो. ते म्हणजे या प्रश्नावर निर्णय घेण्याचा अधिकार सरकारला नाही, हा वास्तविक कोणत्याही शहाण्या समाजात नैसर्गिक काय किंवा अनैसर्गिक काय याचा निर्णय सरकारने करावा ही अपेक्षाच कालबाह्य आहे. दुसरे असे की नैसर्गिक / अनैसर्गिक याबाबतचे संकेत कालानुरूप असतात बदलत्याकाळाची दखल न घेता समलैंगिकतेस अनैसर्गिक आणि पुढे गुन्हेगार ठरवणे ही आपल्याकडची दांभिकतेची परिसीमा होती ती दूर करण्याची हिंमत पहिल्यांदा दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ए.पी.शहा यांनी दाखवली. 2009 साली दिलेल्या एका ऐतिहासिक निकालात त्यांनी समलैंगिकतेत अनैसर्गिक असे काही नाही असे स्पष्ट करीत या संबंधाना गुन्ह्याच्या पडद्याआडून बाहेर काढले. तो मोठा निर्णय होता आणि सरकारने त्याचा आधार घेत महत्वाची सुधारणा करून टाकण्यात शहाणपणा होता. तो त्या वेळी सरकारला दाखवता आला नाही आणि आताही तसे करणे सरकारने टाळले. त्यात सर्वोच्च न्यायालयाने नंतर दिल्ली उच्च न्यायालयाचा तो निर्णय फिरवल्याने ही समस्या अधिकच गुंतागुंतीची झाली. त्यावर लोकसभेत कायदा करून बदल घडवणे हा मार्ग होता पण ते धारिष्टय सरकारकडे नव्हेत. एकीकडे समलैंगिक संबंधांस कायदेशीर दर्जा देऊन त्यांना विवाहाचीही परवानगी अनेक पुढारलेल्या देशांत दिली जात असताना आपण मात्र वसाहतकालीन नैतिकताच कवटाळून होतो.

अखेर सर्वोच्च न्यायालयानेच यातून आपली सुटका केली. तसे करताना आपल्याच निर्णयाचा पुनर्विचार करण्याची तयारी या न्यायालयाने दाखवली हे अभिनंदनीय आणि स्वागतार्ह आहे. सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. इंदू मल्होत्रा, न्या. आर. एफ. नरिमन आणि न्या. अजय खानविलकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना समलैंगिकतेस गुन्हा ठरवणारा जवळपास दीडशे वर्षाचा जुना कायदा सहमतीने होणाऱ्या कोणत्याही लैंगिक वर्तनाबाबत गैरलागु ठरविला. इतकेच नाही तर व्यक्तीच्या अन्य मुलभूत अधिकारांप्रमाणे आणि अधिकारांइतकाच समलैंगिकता हा देखील मूलभूत अधिकार आहे. हे न्यायालयाने स्पष्ट केले आपणास विकसित समाज म्हणवून घ्यावयाचे असेल तर व्यक्ती आणि समाजास त्यांचे त्यांचे पूर्वग्रह सोडावे लागतील अशा पूर्वग्रहांमुळे आपण इतरांवर अन्याय करत असतो, याचीही जाणीव सर्वोच्च न्यायालयाने या निकालात करून दिली. हे विधान दूरगामी ठरू शकते गोमास आदी प्रश्नांवरचे पूर्वग्रह आपल्याकडे दिसू लागले आहेतच असो न्या. इंदू मल्होत्रा यांची अलीकडेच सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झाली. या घटनापीठातील त्या एकमेव महिला न्यायाधीश हा निकाल देताना त्यांनी काढलेले उदगार दखलपात्र ठरतात. समलैंगिकांना आपण ज्या पध्दतीने इतका काळ वागवले त पाहता समाजाने त्यांची माफी मागायला हवी, असे न्या. मल्होत्रा म्हणाल्या असे काही करण्याइतकी आपली सामाजिक प्रगल्भता नाही, ही बाब अलाहिदा.

9. खालील विधानांपैकी कोणते विधान किंवा विधाने सत्य कि असत्य ते ओळखा ?

अ) सामाजिक विचारांचा प्रवाह ज्या समाजात तकलादू असतो तो समाज बहुमताचा आधार घेतो

ब) बहुमतवादी दृष्टीकोन आणि प्रचलित नैतिकता हे घटनादत्त अधिकारांपेक्षा मोठे नाहीत

1) अ सत्य, ब असत्य 2) अ, ब सत्य 3) अ, असत्य, ब सत्य 4) अ, ब असत्य

10. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाने समलैंगिकतेबाबत कोणता निर्णय दिला ?

अ) सहमतीने होणाऱ्या लैंगिक वर्तनाबाबत जुना कायदा गैर लागू ठरवला

ब) समलैंगिकता हा मूलभूत अधिकार आहे

क) विकसित समाजात व्यक्ती आणि समाजास पूर्व ग्रहानुसार चालावे लागते

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) अ, ब, क

11. लेखकाच्या मते कोणते साधे तत्व समाजास नामंजुर होते ?

अ) वरून कीर्तन आतून तमाशा हे व्यवच्छेदक लक्षण

ब) समलैंगिकतेस अनैसर्गिक गुन्हेगार विकृत न ठरवणे

क) कोणत्याही व्यक्तीच्या कृत्याचा इतरांना उपद्रव होत नाही तो पर्यंत त्यांच्या व्यक्तीगत स्वातंत्र्यावर बाधा आणता येत नाही

1) अ, ब 2) ब, क 3) ब 4) यापैकी नाही

12. समाजात समलैंगिकतेस मान्यता नाही म्हणून

अ) समलैंगिकतेस गुन्हेगार ठरवले गेले

ब) पोलिस आदि यंत्रणांचे फावले गेले

क) समलैंगिक संबंधास थांबणे अशक्य होते

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) अ, ब, क

**प्रश्न क्रमांक 13 ते 15 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

फोर्बस हे मासिक दरवर्षी जगातील सर्वाधिक धनवंतांची एक यादी जाहीर करीत असते. तिच्या बातम्या लोक आवडीने कुतूहलाने वाचतात अनेकांच्या मनात त्या धनिकांबद्दल कौतूक असते. कधी हेवा आणि असूयाही परंतू त्यातही एक सुक्ष्मसा फरक असतो. त्या यादीतील सर्वाबद्दलच तसे वाटत नसते. जगाला मुठीत ठेवू पाहणाऱ्या कवेत घेऊ पाहणाऱ्या त्या थोडयांच्या श्रीमंतीविषयी तिरस्काराची भावनाही असते. अनेकांच्या मनात याचे कारण संपत्तीविषयी कितीही आकर्षण असले तरी त्याच मनात साधनशुचितेची एक विवेकनिष्ठ कसोटीही दडलेली असते. त्या कसोटीवर आपण संपत्तीसंचय आणि तो करणारे श्रीमंत यांना घासून पाहत असतो. त्या कसोटीवर त्या संपत्तीची सन्माननीयता आपण ठरवीत असतो त्या श्रीमंतीला आपण जुलमाचा रामराम करू नाईलाजाने पण तिला आदर मात्र कधीही देणार नाही. तद्दन मध्यमवर्गीय विचार म्हणून याची खिल्ली उडविणे सोपे आहे परंतु साधनशुचितेचे हेच विचार समाजाचा तोल राखत असतात. हे जे व्यकतीबाबत तेच कंपन्यांबाबत ॲपल या कंपनीने अनेकांच्या मनातील ही आदरभावना कमावली आहे. ही बाब जाहिरातींतून प्रचारातून होत नसते प्रचाराला लोक प्रारंभी भाळतातही परंतु पुढचा संसार हा प्रचारी घोषणांवर चालत नसतो. तेथे बाप दाखव नाही तर श्राध्द कर हाच रोकडा व्यवहार असतो. तेथे उत्पादनांची गुणवत्ता आणि कार्यक्षमता हेच महत्वाचे ठरत असते. ॲपलने या कसोटीवर स्वत:स सिध्द केले आहे हे दिसतेच आहे. परंतु गुणवत्ता आणि कार्यक्षमता याबाबत ॲपलच्या उत्पादनांशी स्पर्धा करू शकतील अशी अन्य कंपन्यांची उत्पादने बाजारात आहेतच तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की मग ॲपलला ह जे यश आणि लौकिक मिळाला त्याचे नेमके रहस्य कार्य ? ते दडले आहे या कंपनीच्या आणि तिचे एक संस्थापक स्टीव्ह जॉब्ज यांच्या मूल्यविचारांमध्ये आज ॲपलच्या आर्थिक यशाने अनेकांच्या मनात उमटणारी समाधानाची भावना ही त्या मूल्यांना दिलेली पावती आहे. स्टीव्ह जॉब्ज औद्योगिक युग आणि माहिती - तंत्रज्ञानाचे युग यांच्या मीलनरेषेवरील पिढीचे प्रतिभावंत अपत्य आहे त्याच्या संपूर्ण मूल्यविचारांवर या गोष्टीचा मोठा पगडा आहेच. काही काळ तो भारतात राहून गेला होता येथील बौध्द आणि जपानी झेन विचारांनी तो प्रेरित झाला होता या सर्व बाबीनी त्याचा उत्पादनांबाबतचा दृष्टीकोन घडविला आहे. औगिक युगात जन्मास आलेला सौंदर्यविचार घेऊनच तो त्याच्या उत्पादनांकडे पाहत होता. उपयुक्ततावाद ही त्यातील कळीची बाब होतीच परंतु उपयुक्तता हे तत्व सौंदर्याला छेद देणारेच असते असे नव्हे आणि याची उलट बाजू म्हणजे सुंदरसा अभिकल्प - डिझाइन, म्हणजे उपयुक्ततेशी तडजोड असेही नसते पुन्हा या सगळयाच्या तळाशी बौध्द तत्वज्ञानाच्या अभ्यासातून आलेला साधेपणा हे मूलभूत तत्वही होते अजूनही आहे. ॲपलचे कोणतेही उत्पादन घ्या त्यात तो दिसणारच या तत्वांवर जॉब्ज एवढा ठाम होता की, एकदा ॲपलचे कोणतेही उत्पादन बाजारात गेले की त्यात कोणालाही छेडछाड करण्याची संधीच मिळता कामा नये असा त्याचा आग्रह असे याला जॉब्ज यांची अहंमन्यता असेही कोणी म्हणू शकेल परंतु त्या अहंमन्यतेमागे आपल्या उत्पादनांच्या दर्जाबाबतचा त्यांच्या सौंदर्यपूर्ण अभिकल्पाबाबतचा प्रचंड आत्मविश्वास होता. म्हणूनच जॉब्जचा ॲपल उत्पादनांबाबतचा अभिजनवाद शोभूनही दिसला आणि लाखो ग्राहकांना भावलाही ॲपलच्या उत्पादनांचे एक स्वतंत्र विश्वच निर्माण झाला आहे स्वयंपूर्ण असे त्या जगात अन्य कोणालाही प्रवेश नाही अर्थात छोटया छोटया गोष्टीत सौदर्य, गुण्वत्ता आणि ग्राहकांची गरज यांचया समन्वय जर येथेच मिळणार असेल तर ॲपलच्या खासगी बागेत अन्य कोणाला कोणी घुसू तरी का देईल ? अत्यंत निष्ठावंत ग्राहकांचा वर्ग ॲपलला मिळाला तो या कंपनीच्या या छानशा मिजासखोरीमुळेच ॲपलच्या यशाचे सहस्य आहे ते यात त्याला अर्थातच आणखीही एक महत्वाची किनार आहे. ती म्हणजे अमेरिकेच्या सामाजिक आर्थिक व्यवस्थेची

सिरियातून आलेला अब्दुलफताह जंदाली नामक मुस्लिम स्थलांतरित हा ज्याचा जन्मदाता, कामगारवर्गातील दाम्पत्याने ज्याचे पालनपोषण केले तारूण्यासोबत येणारे सगळे रंगढंग ज्याने केले अमली पदार्थाचे व्यसन केले तेव्हाच्या हिप्पी तरूणांप्रमाणे श्रेयस आणि शांतीच्या शोधात ज्याने धार्मिक तत्वज्ञानाचीही भेट घेतली त्या स्टीव्ह जॉब्ज नामक अवलिया प्रतिभावंताची ही कंपनी घरातील वाहनगृहातून व्यवसायाला सुरूवात केली होती त्याने आज ती जगातील आर्थिकदृष्टया सर्वात प्रबळ कंपनी आहे हे घडू शकले याचे कारण अमेरिकेत व्यक्ती असो व संस्था वा कंपन्या यांच्या वाढीस मिळू शकलेला अवकाश एका वाढणाऱ्या झाडामुळे बाकीच्या रोपांना प्राणवायू आणि सुर्यप्रकाश कमी मिळेल या भयाने त्या झाडाच्या फांद्या छाटण्याचे कुडकुडे साम्यवादी उपदव्याप करण्याऐवजी सर्वांनाच तो कसा मिळेल याची काळजी घेणारी ती व्यवस्था अशाच व्यवस्थेत स्टीव्ह जॉब्ज फुलू शकतात आणि ॲपल बहरू शकते असंख्य भारतीय आज स्वप्न पाहत आहेत ते या अवकाशाचेच या व्यवस्थेचेच ॲपलने एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शुन्ये डॉलर म्हणजे सुमारे 68 लाख कोटी रूपये एवढा मोठा बाजारमूल्याचा टप्पा गाठवला याने समाधानाची सुंदरशी भावना आपल्याकडेही अनेकांच्या मनात निर्माण झाली ती काही उगाचच नव्हे .................. अखेर मूल्यांच्या जपणुकीतूनही यश मिळू शकते या स्वप्नावरचा विश्वास वाढविणारी अशी ही एकावरची बारा शून्ये आहेत.

13. लेखकाच्या मते ॲपलला जे यश आणि लौकिक मिळाला त्याचे नेमके रहस्य कोणते ?

अ) ॲपलने गुणवत्ता आणि कार्यक्षमता याबाबत स्वत:स सिध्द केले

ब) ॲपलच्या उत्पादनात सौंदर्य गुणवत्ता आणि ग्राहकांची गरज यांचा समन्वय आहे

क) ॲपलने बाजार आणि मूल्ये यांचा समन्वय राखला

1) अ, क 2) अ, ब 3) ब, क 4) अ, ब, क

14. स्टीव्ह जॉब्ज यांच्या मूल्य विचारामध्ये कोणत्या बाबींचा समावेश नव्हता ?

अ) उपयुक्ततेसाठी उत्पादनाच्या सौंदर्याला छेद देता येतो

ब) उपयुक्ततेपेक्षा उत्पादनाच्या सौंदर्याला जास्त महत्व असते

क) लोकांची गरज पूर्ण करणे हेच तत्व उत्पादनात असले पाहिजे

1) अ 2) ब, क 3) क 4) अ, ब, क

---

15. लेखकाच्यामते आजही भारतीय कोणते स्वप्न पाहत आहे ?

अ) असंख्य भारतीय अवकाशाचे स्वप्न पाहत आहे

ब) अमेरिकेत व्यक्ती, संस्था, कंपन्या यांना मिळालेल्या सुविधांसारखी व्यवस्थेची

क) अमेरिकेसारखी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेची

1) अ 2) ब, क 3) क 4) अ, ब, क

---

**प्रश्न क्रमांक 16 ते 18 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

इंग्लंडच्या दौऱ्यावर कसोटी मालिका खेळण्यासाठी गेलेल्या भारतीय संघासाठी सध्या पळता भूई थोडी झालेल आहे. मुळात अजूनही इंग्लंडमध्ये भारतीय क्रिकेट संघाला फारशा कसोटी मालिका जिंकता येत नाहीत. अशा चाचपडलेल्या स्थितीत आपला संघ असताना, इंग्लिश भूमीवर भारताला पहिली कसोटी मालिका जिंकून देणारे कर्णधार अजित वाडेकर यांचे जाणे मन अधिकच खंतावणारे ठरते. वाडेकर यांचे जाणे हा इतरही अर्थानी युगान्त ठरतो. क्रिकेट हा सभ्य गृहस्थांचा खेळ आहे हे विधान हास्यास्पदच ठरविणारी सध्याची स्थिती 'स्वॅगर'च्या नावाखाली भावनांचे उघडेवागडे प्रदर्शन मांडणे हे फॅशन स्टेटमेंट वगैरे बनले आहे. पण वाडेकर यांनी मात्र अंगभूत सभ्यता, शालीनता क्रिकेटमध्येही रूजवली त्यांचे व्यक्तिमत्व क्रिकेटच्या मैदानावर आणि मैदानाबाहेर, क्रिकेटपटू कर्णधार, व्यवस्थापक, निवड समिती अध्यक्ष अशा विविध रूपांमध्ये वावरत असताना आणि अगदी अखेपर्यंत तसेच राहिले. त्यांनी क्रिकेटला सामावून घेतले. अनेक जबाबदाऱ्या यथार्थ पार पाडल्या. पण क्रिकेटमुळे ते झाकोळले गेले नाहीत. क्रिकेट हेच सुख - दुख होऊन बसते आणि क्रिकेटला सोडू शकत नाहीत असे अनेक लहान - महान क्रिकेटपटू आपल्या आजूबाजूला वावरत असताना वाडेकर यांनी मात्र एक सन्मान्य अलिप्तपणा जपला.

यशाची चव चाखल्यानंतर असा अलिप्तपणा सोपा नसतो 1960 च्या दशकात अजित वाडेकर एक क्रिकेटपटू आणि नंतर कर्णधार म्हणून उद्याला आले. 1967 च्या न्यूझीलंड दौऱ्यात मन्सूर अली खान पतौडी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने परदेशी पहिला विजय मिळवला त्या वेळी त्या सामन्यात वाडेकरांनी शतक झळकावले ते त्यांचे एकमेव शतक म्हणजे परदेशी भूमीवरील पहिल्या विजयामध्ये वाडेकर यांचेही योगदान होतेच. पण ती त्यांची सर्वपरिचित ओळख नाही. ते घराघरांमध्ये पाहोचले त भारतीय संघाने त्यांच्या नेतृत्वाखाली प्रथम वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये आणि नंतर इंग्लंडला इंग्लंडमध्ये हरवल्यानंतर हे दोन्ही संघ त्या वेळी बलाढय होते आणि मायदेशी खेळत होते. त्यांच्या तुलनेत भारतीय खेळाडू हौशे - नवशेच गणले जात बरेचसे सधन कुटुंबाची पार्श्वभूमी असलेले देखणे क्रिकेटपटू सामन्यातले काही तास (पण पूर्ण सामना नव्हे) मनोरंजन करीत आणि खुल्या दिलाने पराभवाला सामोरे जात अशी भारतीय क्रिकेटपटूंची गोंडस प्रतिमा होती. तिला तडे देण्याची जबाबदारी भारतीय क्रिकेटपटूंची होती आणि पतौडीच्या संघाने त थोडयाफार प्रामणात करूनही दाखवले होते. पण न्युझीलंडचा संघ म्हणजे इंग्लंड - वेस्ट इंडीज - ऑस्ट्रेलियाचा संघ नव्हता त्यामुळे वाडेकरांच भारतीय संघाने इंग्लंड आणि वेस्ट इंडिज जिंकल्यानंतरच भारतीय क्रिकेटला जगात गांभीर्याने घेतले जाऊ लागले फार थोडया भारतीय कर्णधारांनी अशा प्रकारचा खमकेपणा त्यापूर्वी दाखवला एक फलंदाज म्हणून वाडेकर डावखुरे होते आणि शैलीदार, आक्रमक खेळायचे त्यांची आकडेवारी चांगली असली. तरी असामान्य नाही कसोटीमध्ये एकापेक्षा अधिक शतके झळकवण्याची त्यांची योग्यता होती कर्णधारपदाची जबाबदारी घेतल्यानंतर त्यांचा धावांचा ओघ आटला असे सांगितले जाते पण सभ्य सुसंस्कृत शालीन असले तरी वाडेकर एक चिवट कणखर फलंदाज होते वेस्ली हॉल, जॉन स्नो, चार्ली ग्रिफिथ यांच्यासमोर उभे राहून अनेकदा उसळत्या चेंडूचा मारा सहन करत त्यांनी प्रतिहल्ले चढवलेले आहेत

पण वाडेकरांचे विश्लेषण क्रिकेटच्या पलीकडे जाऊन करावे लागेल. वाडेकर हे मध्यवर्गीय, सुसंस्कृत मराठी 'आयकॉन' होते शाळेत कधी क्रिकेट खेळले नाहीत कारण चांगले शिकून कारकीर्द बनवण्याच्या मानसिकतेचा पगडा त्यांच्या घरावरही होता. एका परीक्षेत चांगले गुण मिळाल्याबद्दल बक्षीस म्हणून वाडेकरांच्या हातात पहिल्यांदा बॅट दिली गेली. क्रिकेटपटू म्हणून कारकीर्द घडण्यास सुरूवात झाल्यानंतरही बँकिगसारखी सुरक्षित नोकरी त्यांनी पत्करली मूल्यांवर विश्वास होता त्यातून आत्मविश्वासाला बळ मिळाले त्यामुळेच पूर्वीचे अनेक बडे बडे कर्णधार करू शकले नाहीत अशी कामगिरी त्यांनी करून दाखवली महत्वाकांक्षेच्या राक्षसाने कधी त्यांच्यावर गारूड केले नाही. याच मूल्याधिष्ठित आणि अभिमानी मानसिकतेतून सुनील गावस्कर उद्याला आहे. सचिन तेंदुलकर जन्माला आला. मुंबई क्रिकेटला 'खडूस' म्हणून हिणवणाऱ्यांना हे गुण कळलेच नाहीत प्राप्त परिस्थितीत हे गुण यशस्वितेची शाश्वती देऊ शकत नाहीत असे कॉर्पोरेटीकरणाची झिंग चढलेले विव्दान छातीठोकपणे सांगतात. वाडेकर यांनी कधी त्यांचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला नाही सुनील गावस्कर आघाडीवर म्हणून फलंदाजीस जाताना 'सी यू स्किपर' या शब्दांत वाडेकरांचा निरोप घेत 'नॉट फॉर अ लॉंग टाइम' असे त्यावर वाडेकर बजावत आपल्या हाताखालील खेळाडूंनी काय करावे याचा हा खास वाडेकरी शैलीतला सल्ला नेमका आणि अभिनिवेशविरहित तरीही परिणामकारक! नेमके हेच गुण गाण्यात असलेल्या हिराबाई बडोदेकरांनी जसा महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय महिलेला रंगमंच मिळवून दिला, तसे वाडेकरांनी सुशिक्षित मध्यवर्गीय मराठी तरूणांना अव्वल क्रिकेटचे मैदान मिळवून दिले. वाडेकरांचा हा वारसा नाकरता येणारा नाही

16. वरील उताऱ्यात महाराष्ट्रीय मध्यमवर्गीयांसाठी कार्य केलेले वाडेकर यांच्या व्यतिरिक्त कोणत्या व्यक्तीचा उल्लेख लेखकाने केला आहे ?

अ) सुनिल गावस्कर ब) सचिन तेंडूलकर क) हिराबाई बडोदेकर

1) अ, ब, क 2) अ, ब 3) अ 4) क

---

17. खालीलपैकी अजित वाडेकर यांची सर्वपरिचित ओळख कोणती ?

अ) कर्णधार अजित वाडेकर यांनी इंग्लिश भूमीवर भारताला पहिली कसोटी मालिका जिंकून दिली

ब) 1967 च्या न्युझीलंड दौऱ्यात वाडेकरांनी शतक झळकावून परदेशी भूमिवर पहिला विजय मिळवला

क) कर्णधार अजित वाडेकर यांनी प्रथम वेस्ट इंडिजमध्ये वेस्टइंडिजला व इंग्लंडमध्ये इंग्लंडला हरविले

1) अ, ब, क 2) अ 3) ब 4) क

---

18. लेखकाने अजित वाडेकरांना कोणकोणत्या गुणविशेषणांनी विभूषित केले आहे ?

अ) शालीनता ब) महत्वकांक्षी क) सुसंस्कृतपणा ड) आक्रमक

1) अ, ब, क 2) अ, क, ड 3) ब, क, ड 4) अ, ब, क, ड

---

**प्रश्न क्रमांक 19 ते 21 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

अर्थात हा सारा विषय सध्या सरकारच्या झालेल्या कोंडीतून पुढे आला आहे. पण त्याच वेळी सरकारी कर्मचाऱ्यांना बढती देताना ती जातीय निकषांच्या आधारावर द्यायची की गुणवत्तेला प्राधान्य द्यायचे हाही मद्दा त्यात गुंतला आहे त्यामुळेच या विषयावरून समाजात रणकंदन माजू शकते आणि तसे झाल्यास मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याच्या निर्णयावरून समाजात जशी आणखी दरी पडली होती तसेच वातावरण निर्माण होऊन समाज अधिकाधिक दुभंगण्याचा धोकाही समोर येऊ शकतो तसे झाल्यास ज्या समाजाच्या हितासाठी हा निर्णय घेतल्याचा पवित्रा काँग्रेसने घेतला आहे. त्याच समाजाला त्याचा फटका बसू शकतो पण कोळसा खाणवाटप आणि अन्य प्रश्नांवरून सरकार कमालीचे अडचणीत सापडलेले असताना, काँग्रेस नेत्यांनी हा चलाख डाव टाकला आणि भाजपसह सर्वच विरोधी पक्षांची मोठी पंचाईत केली, यात शंकाच नाही. अर्थात या घटनादुरूस्ती विधेयकास सध्या सरकारला अत्यंत गरजेचा असा पाठिंबा देण्यारा समाजवादी पक्ष विरोध करणार, हे सरकारला ठाऊक असणारच मुलायमसिंह यादव यांचा विरोध हा इतर मागासवर्गीयांच्या नावाखाल झाला असला तरी त्यामागील खरे इंगित हे यदाकदाचित हे विधेयक मंजूर झालेच तर त्याचे 'श्रेय' मायावतींना जाणार या आकसापोटी आहे त्यामुळे आपल्या देशातील राजकारणी कायम स्वहेतूंनी प्रेरित राजकीय डावपेच कसे आखत असतात यावरही प्रकाश पडला आहे पण यात खरी कोंडी झाली ती भाजपची त्यांना या विधेयकाला विरोधही करता येणे अवघड आहे आणि ते मांडू दिल्यास पंतप्रधानांनी राजीनामा दिल्याशिवाय कामकाज चालू न देण्याची प्रतिज्ञाही भंग पावते! आता या विधेयकाला राज्यसभेत झाले तीव्र विरोध बघून 'प्रतिपक्षाचे मान आम्ही वळव' अशी भाषा सुशीलकुमार शिंदे यांनी सुरू केली आहे. पण त्यात काही अर्थ नाही महिला आरक्षणाच्या वेळीही सरकार अशीच भाषा वापरत होते पण तरी ते विधेयक अजून संसदेच्या पायऱ्यांवर लोंबकळत पडलेले आहे. त्यामुळे बढत्यांमधील आरक्षणाचे काय होणार ते वेगळे सांगण्याची गरज नाही.

19. वरील उतारा प्रामुख्याने कशाशी संबंधित आहे ?

1) महिलांना आरक्षण देण्यासांबंधी

2) बढत्यांमधील आरक्षणाव्दारे दलित मतपेढयांना खूष करण्यासाठी

3) राजकीय डावपेच समजण्यासाठी

4) बढत्यांमधील आरक्षणाबाबत काय काय राजकीय डावपेच चालू आहेत त्याविषयी

---

20. उताऱ्याप्रमाणे आपल्या देशातील राजकारणी राजकीय डावपेच आखताना कोणत्या गोष्टीना प्राधान्य देतात ?

1) सामाजिक आर्थिक विकासाला

2) देशाच्या समतोल आर्थि विकासाला

3) स्वत:च्या खाजगी हेतूंना किंवा संकुचित जातीय क्षेत्रीय आणि राजकीय हेतूंना

4) वरीलपैकी सर्व

---

21. वरील उताऱ्यास योग्य शिर्षक सूचवा ?

1) महिलांचे आरक्षण आणि राजकारण

2) मंडल आयोग, त्याच्या शिफारशी आणि परिणाम

3) शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास घटकाला आरक्षण आणि त्याचे परिणाम

4) आरक्षणयाच्या राजकारणाला 'बढती'

---

**प्रश्न क्रमांक 22 ते 25 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

नक्षल्यांचे सर्वात शक्तिशाली प्रभावक्षेत्र अशी बस्तरची ओळख आहे. येथे निवडणूक प्रक्रिया पार पाडणे मोठे आव्हान असते अलीकडच्या दोन वर्षात नक्षलीची हिंसा कमी झाल्याने सरकारी यंत्रणेने यंदा दुर्गम भागात मतदान केंद्रे थाटण्याचा निर्णय घेतला ती दाखवण्यासाठी नेण्यात येणाऱ्या माध्यम पथकालाच लक्ष्य करून नक्षलींनी सुरक्षा व्यवस्थेत वावरणारे सारेच चळवळीचे शत्रू असा संदेशच सर्वांना दिला आहे दंतेवाडा जिल्ह्यातील पालनारच्या परिसरात निलावया या गावात 20 वर्षानंतर प्रथमच थाटलेल्या या केंद्राला गेल्या तीन दिवसापासून अनेक पत्रकार सुरक्षा व्यवस्थेत भेट देत होते माध्यमांना रोज एकाच माध्यमांना रोज एकाच मार्गावरून नेण्याची सुरक्षा दलाची चूक नक्षल्यांनी बरोबर हेरली व या निवडणुकीला हिंसाचाराचे गालबोट लावले. गेल्या दोन वर्षात नक्षलीचा हिंसाचार कमी झाला याचा अर्थ त्यांची ताकद कमी झाली असे होत नाही हा धडासुध्दा या ताज्या हिंसाचाराने राज्यकर्त्यांना मिळाला आहे. गृहखात्याच्या ताज्या अहवालात या चळवळीचे कार्यक्षेत्र कमी झाले असते तरी त्यांची हिंसा घडवण्याची क्षमता प्रचंड आहे. असा स्पष्ट उल्लेख आहे. तरीही घटत्या हिंसाचाराला सरकारच्या यशस्वी कामगिरीशी जोडण्याची चूक अनेक राज्ये करीत आहेत. अशा वेळी घडवून आणलेला हिंसाचार या राज्यांना तोंडाशी पाडतो हे गेल्या आठवडयातील घटनांनी दाखवून दिले. मुळात विकास झाला तरच ही चळवळ संपेल हा दावा अर्धसत्य आहे. या विकासाचे स्वरूप सर्वांना सामावून घेणारे असेल व जेव्हा जनतेचा विश्वास सरकारवर वाढेल तेव्हाच या चळवळीची घसरण सुरू होईल हे सत्य आहे. सरकारी यंत्रणांना अजून हे उमगलेले दिसत नाही. रस्ता झाला त्यामुळे मतदान केंद्र सुरू झाले म्हणून तेथील जनता खूश असा निष्कर्ष काढणे किती दूधखूळेपणाचे आहे हे या घटनेने दाखवून दिले आहे. चार दिवसांपूर्वी याच राज्यात बिजापूर

जिल्ह्यात अशाच हल्ल्यात चार जवान शहीद झाले. कच्चा रस्त्यावरून शोधमोहीम राबवताना वाहन वापरण्याचा निर्णयसुध्दा सुरक्षा दलांच्या अंगाशी आला. मानक कार्यपध्दतीच्या पालनावर या दलाकडून वारंवार होणाऱ्या चुका हा चिंतेचा विषय असला तरी वरिष्ठ पातळीवर त्यांची गांभीर्याने दखल घेतली जात नाही, हे दुर्दैवी आहे. गेली चार दशके सुरक्षा दलांकडून नक्षली बीमोडासाठी मोहिमा आखल्या जात आहेत, पण अजूनही या दलाल व्यावसायिक अंगभूतपणा भिनलेला नाही हेच दाखवून देणाऱ्या या घटना आहेत गेल्या दशकभराचा काळ लक्षात घेतला तर स्थानिक जनता नक्षलीच्या हिंसाचाराला कंटाळली आहे हे दिसते पण याचा अर्थ त्यांचा सरकारी यंत्रणांवर विश्वास वाढला असा काढणे आजही धाडसाचे ठरते याच काळात नक्षलीच्या स्थानिक समर्थकांची संख्या कमी झाली असली तरी ते अपुऱ्या मनुष्यबळावर हिंसा घडवून आणत सरकारला जेरीस आणू शकतात हे या घटनांमधून दिसून आले आहे. निवडणूकीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा दुर्गम भागात प्रवेश करते व नक्षली याच संधीची वाट पाहात असतात. त्यामुळे या काळात हिंसाचार वाढतो. अशा वेळी योग्य ती खबरदारी घेणे सुरक्षा दलांची जबाबदारी असते ती न घेतल्याने आठ जणांना जीव गमवावा लागला. वारंवार होणाऱ्या चूकांमधूनही धडा न शिकणे याचा हा परिपाक आहे

22. वरील उताऱ्याची मध्यवर्ती संकल्पना कोणती ?
अ) आपूऱ्या मनुष्यबळावर सुध्दा नक्षली हिंसा घडवून सरकारला जेरीस आणतात
ब) सुरक्षा यंत्रणा वारंवार होणाऱ्या चुकामधून सुधारणार कधी ?
क) नक्षली हिंसाचाराबाबत भ्रमात असलेले सुरक्षादल जागे होणार नाही
1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

---

23. नक्षल वाद्यांना हिंसाचार घडवून आणणे यास पुरक असणाऱ्या बाबी कोणत्या ?
अ) सुरक्षा यंत्रणातील ढिसाळपणा
ब) मानक कार्यपध्दतीकडे झालेले दुर्लक्ष
क) हिंसाचारातील घसरण हा सुरक्षा यंत्रणांचा भ्रम
1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

---

24. निवडणूकीच्या काळात हिंसाचारात वाढ होते
अ) निवडणूकीच्या कार्यासाठी सरकारी यंत्रणा दुर्गमभागात जाते
ब) संरक्षण यंत्रणांकडून वारंवार होणाऱ्या चुका दुरूस्त होत नाही
क) संरक्षण दलात व्यावसायिक अंगभूतपणा भिनलेला दिसत नाही

---

1) अ 2) ब 3) अ, ब 4) अ, ब, क

25. लेखकाच्या मते नक्षली चळवळीबाबत सरकारने कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात ?
अ) सरकारने नक्षली क्षेत्रातील जनतेचा विश्वास संपादन करावा
ब) सुरक्षा यंत्रणेत वारंवार होणाऱ्या चुका टाळाव्यात
क) हिंसाचारात झालेली घट म्हणजे सरकारचे यश नव्हे
1) अ 2) ब 3) अ, ब 4) अ, ब, क

---

**प्रश्न क्रमांक 26 ते 29 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

चिटफंडच्या माध्यमातून केरळ राज्यामध्ये विविध योजना राबवून त्या कायद्याअंतर्गत चालविल्या जातात. त्यामुळे त्या ठिकाणी ही चिटफंड पध्दत यशस्वी झाली आहे. तसेच याच्या माध्यामातून मोठया प्रमाणात विकासही केरळ राज्यामध्ये घडून आला आहे. चिटफंड पध्दती ही सर्वसामान्य लोकांमध्ये प्रचलित आहे. यामध्ये लोक गुंतवणूक करून अडचणीच्यावेळी एक मोठी रक्कम उभी करू शकतात.

थोडया प्रमाणातही गुंतवणूक करून आपल्या गरजा भागविण्यासाठी या रक्कमेचा वापर करता येतो. चिटफंड ही योजना मुळातच अविश्वसनीय व फसवी असते त्यामुळे याचा विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून येतो. भारतातील अनेक राज्यांमध्ये चिटफंड ही योजना बेकायदेशीरपणे चालू आहे. त्यामुळे या योजनेवर नियंत्रण राहत नसल्यामुळे अनेक गैरव्यवहार होतात व त्याचा प्रत्यक्ष प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेवर पडतो. चिटफंड योजनेच्या माध्यमातून काळा पैसा पांढरा करण्याचे काम केले जाते.

चिटफंड सारख्या योजना सुरू करताना कंपनीने प्रर्वतक जाणिवपूर्वक त्याची माहिती सेबी, आरबीआय, आयकर विभाग यांच्यापासून दडवून ठेवतात. यामुळे या चिटफंडाच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांवर कोणाचेच नियंत्रण राहत नाही. यामुळे गैरव्यवहार होऊन अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो.

या गैरव्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने व राज्य सरकारने केलेल्या कायद्याअंतर्गत यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यात येते. सध्या कायदे आहेत पण नियंत्रण नाही. चिटफंडामध्ये होणारी गुंतवणूक व त्या गुंतवणूकीचा करण्यात येत असलेला वापर यावर वित्तीय संस्थांनी जसे सेबी रिझर्व्ह बँक यांनी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. चिटफंड हा जरी राज्य सूचीतील विषय असला तरी त्या संदर्भात केंद्र सरकारनेही हस्तक्षेप करून त्या संदर्भात विविध प्रयत्न करणे गरजेचे आहे. सरकारने केलेल्या कायद्याची माहिती जनतेला व्हावी यासाठी जाहिराती व विविध वित्तीय संस्थाअंतर्गत कार्यक्रम यांचा वापर करण्यात यावा. त्यामुळे सामान्य लोकांना कायद्याची माहिती मिळाल्यामुळे अकराव्या योजनेला बळी पडणार नाहीत.

लोकांनी एखाद्या योजनेची सखोल माहिती घेवूनच पैशांची गुंतवणूक करावी. जर एखादी योजना लोकांची दिशाभूल करून त्यांचे पैसे हडप करणारी आहे, असे जाणवल्यास त्यासंबंधी पोलिसांकडे जावून तक्रार करावी. एखाद्या योजनेमध्ये अवाढव्य प्रमाणात गुंतवलेल्या रक्कमेवर व्याज, विधि सवलती अश अमिषांना बळी पडू नये. कारण अशा योजना शेवटी बंदच पडतात व मुद्दलही भेटत नाही. सर्वसामान्य लोकांनी श्रीमंत होण्याच्या प्रयत्नात बिगर नोंदणीकृत चिटफंड, पिरॅमिड किंवा मल्टिलेव्हल मार्केटिंग सारख्या योजनांना बळी न पडता, बँका, पोस्ट ऑफिस व चांगल्या कंपन्यांतच आपला पैसा ठेवावा.

26. सर्वसामान्य लोकांनी झटपट श्रीमंत होण्यासाठी कोणत्या प्रकारच्या योजनांना बळी पडू नये ?

अ) चिटफंड ब) पिरॅमिड क) मल्टीलेव्हल मार्केटिंग

1) अ, क 2) ब, क 3) अ, ब 4) अ, ब, क

27. कोणत्या कारणामुळे चिटफंडवर कायदेशीर नियंत्रण नाही ?

1) योजनेचे प्रवर्तक पोलिसांपासून माहिती दडवितात

2) योजनेचे प्रवर्तक लोकांपासून माहिती दडवितात

3) योजनेचे प्रवर्तक सेबी, आर.बी.आय. पासून माहिती दडवितात

4) वरीलपैकी नाही

28. चिटफंडामध्ये कशामुळे अविश्वसनीय व फरवी आहे ?

अ) योजनांवर कायदेशीर नियंत्रण नाही ब) काळा पैसा पांढरा करण्याचे काम केले जाते

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ व ब दोन्ही बरोबर 4) अ व ब चूक

29. वरील परिच्छेदात पैसे गुंतवण्याचा सुरक्षित उपाय कोणता सांगितला आहे ?

1) पैसे बँका, पोस्ट ऑफिस व चांगल्या कंपन्यात गुंतवा 2) पैसे चेन मार्केटिंगमध्ये गुंतवा

3) पैसे सावकाराकडे ठेवणे 4) वरील सर्व

**प्रश्न क्रमांक 30 ते 33 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

परीक्षेत उत्तीर्णता तीही उत्तम गुणांनी अशा बहाद्दरांचे कोडकौतुक व्हायलाच हवे. सलग दुसऱ्या वर्षी उद्योगसुलभता निदर्शक निकषांत भारताची दमदार प्रगती असाच कौतुकास पात्र आहे. जागतिक बँकेच्या उद्योगसुलभता क्रमावारीत भारताने 23 पायऱ्यांनी झेप घेऊन 77 व्या स्थानावर मजल मारल्याचे जाहीर झाले. गेल्या वर्षी भारताने 30 पायऱ्यांनी प्रगती साधत 100 वे स्थान पटकावले होते. तर गेल्या चार वर्षात मिळून तब्बल 65 पायऱ्यांनी झालेली ही प्रगती आहे. 2014 साली सत्तेवर आल्यावर मोदी यांनी उद्योगसुलभता क्रमवारीत पहिल्या पन्नासात स्थान मिळविणे हे उद्दिष्ट असल्याचे म्हटले होते. त्यापूर्वी म्हणजे 2014 साली या आघाडीवर आपण 189 देशांत 142 व्या स्थानावर होतो आणि आधीची काही वर्ष आपली उतरंडच सुरू होती. हे पाहता भारताची ताजी आगेकूच दमदारच आहे. आजच्या घडीला जगातील सर्वात वेगाने विकास पावत असलेली अर्थव्यवस्था असण्याबरोबरच जागतिक तुलनेत हिरिरीने सुधारणा राबवीत असलेली अर्थव्यवस्था आपण बनलो आहोत. असा हा संकेत आहे किंबहुना या आघाडीवर दक्षिण आशियाई देशांचे नेतृत्व भारत करीत आहे. असेही जागतिक बँकेने म्हटले आहे. गेल्या दोन वर्षात लागू झालेल्या वेगवेगळया 14 आर्थिक सुधारणा यासाठी ध्यानात घेतल्या गेल्या आहेत. वस्तू आणि सेवा कर नादारी आणि दिवाळखोरी संहिता कंपनी करात कपात या ठळक सुधारणांचा जागतिक बँकेने या अहवालात उल्लेख केला आहे. ताजी उल्लेखनीय आहेच पण यापुढे परीक्षेची काठिण्यपातळी वाढत जाईल आणि पहिल्या पन्नासात स्थान मिळविणे तर अनेकांगांनी अवघड आहे. असेही हा अहवाल सांगतो या अहवालानुसार अनेक क्षेत्रे अशी आहेत जेथे जागतिक तुलनेत भारत आजही पार मागे आहे. उदाहरणार्थ व्यवसायाची सुरूवात करण्यात भारत 137 व्या स्थानावर आहे. सर्व मंजुऱ्या - परवान्यांचे सोपस्कार पूर्ण करेस्तोवर नवउद्योजकाची उपक्रमशीलता उपक्रमशीलता पार विरून जाते व्यावसायिक वाद - तंटे सोडविण्यासाठी भारतास सरासरी 1,145 दिवसांचा कालावधी लागतो विकसित अर्थव्यवस्थांत यासाठी 582 दिवस लागतात. करार मतदारांची अंमलबजावणी आणि पालन दिवाळखोरीच्या प्रकरणांच्या निवारणांत जेमतेम उत्तीर्णता, तर मालमत्ता नोंदणी करपालनाच्या निकषावर तर भारत नापास झाला आहे म्हणजे या जागतिक क्रमवारीच्या 10 मुख्य निंकषांपैकी तीनांत जरी प्रावीण्य मिळविले असले तरी चारांत काठावर आणि तीनांत आपण नापास झालो हे दुर्लक्षून चालणार नाही. मिळविले असले तरी चारांत काठावर आणि तीनांत आपण नापास झालो हे दुर्लक्षून चालणार नाही.

भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दलचा एकूण जागतिक दृष्टिकोन गेल्या काही वर्षात सकारात्मक आहे हे खरेच आहे आणि त्याची काही 'विशिष्ट' कारणेही आहेत. जागतिक बँकेच्या अहवालातील काही निकषांवरील चांगली कामगिरी याचा हवाला देते तथापि आपल्या अर्थव्यवस्थेला बाधा आणणारे अडसर हे कोणा जागतिक संस्थेने नव्हे तर आपणच डोळसपणे पाहायला हवेत अर्थव्यवस्थेत नवीन गुंतवणूक गेली तीन वर्षे गोठलेली आहे. अने बँकांची कर्ज देण्याची क्षमता राहिलेली नाही, तर उरलेल्या बँका क्षमता असूनही कर्ज देऊ इच्छित नाहीत. पायाभूत क्षेत्रात सुरू झालेले व्यवहार्य प्रकल्प बोटांबर मोजण्याइतपतच आहेत. उद्योगांच्या क्षमता वापरात घसरणीसह उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे उद्योगसुलभतेत सुधाराचा दावा मान्य केला तरी उद्योजकता साकारण्यासाठी मोजावी लागणारी किंमत पाहता उपक्रमशील स्वप्नांना सत्यात उतरवणारी सुलभता मात्र उद्याप अनेक योजने दूर आहे, असेच म्हणावे लागेल.

30. पायाभूत क्षेत्रातील प्रकल्प अत्यल्प आहेत असे लेखक का म्हणतात ?

अ) अर्थव्यवस्थेत गोठली गेलेली नवीन गुंतवणूक ब) बँकांची कर्ज देण्याची क्षमता कमी आहे

क) उद्योगधंद्यांना बँका क्षमता असून सुध्दा कर्ज देत नाही ड) उद्योगांच्या उत्पादन खर्चात वाढ झाली आहे

1) अ, ब 2) क, ड 3) अ, क, ड 4) अ, ब, क, ड

31. भारताच्या अर्थव्यवस्थेबाबतचा जागतिक दृष्टीकोन सकारत्मक आहे कारण

अ) जागतिक बँकेच्या उद्योग सुलभता क्रमवारीत भारताची मजल

ब) वस्तू आणि सेवा कर यासारख्या आर्थिक सुधारणा

क) जागतिक तुलनेत सर्वात वेगात विकसित होत असलेली भारतीय अर्थव्यवस्था

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

32. वरील लेख लिहण्यामागील लेखकाचा हेतू कोणता ?

1) उद्योग सुलभता निर्देशक निकषांत भारताची आघाडी

2) जागतिक बँकेने ठळक सुधारणांबाबत प्रगतीचा उल्लेख

3) भारतीय अर्थव्यवस्थेबाबतचा जागतिक दृष्टीकोन

4) प्रगती उल्लेखनीय पण उपक्रमशील स्वप्नांना सत्यात उतरवणारी सुलभता मात्र नाही

33. नविन व्यवसायची सुरवात करण्यात भारत मागे आहे कारण

अ) सर्व परवान्यांचे सोपस्कार पूर्ण करणे जिकरीचे काम आहे

ब) व्यवसायिक अडसर दूर करण्यास जास्त कालवधी लागतो

क) भारतीय अर्थव्यवस्थेत नविन उद्योगांना पायाभूत सुविधा नाही

1) अ  2) क  3) अ, ब  4) अ, ब, क

**प्रश्न क्रमांक 34 ते 36 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

यापैकी पहिले मत हे प्रेक्षक हैदोस घालतात व त्यांचा क्रिकेट खेळाडूंना त्रास होतो, म्हणून क्रिकेट स्टेडियममध्ये प्रेक्षकांनाच बंदी करण्यासारखे आहे. वाघ व वन्यजीवांना पर्यटकांचा त्रास होऊ नये, यासाठी अनेक व्याघ्र प्रकल्पात कडक नियम घालून आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून ही समस्या सुटू शकते हे प्रशासनाने दाखवून दिले आहे. गाभा क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाचे समर्थन करताना, त्याच क्षेत्रात पर्यटन कसे चालू शकेल, याबद्दल माझे वेगळे मत आहे. गाभा क्षेत्रात वसलेल्या गावांव्दारे होणारी अनिर्बंध चराई, जळाऊ लाकूड, बांबू, चटया व इतर वनोपज काढण्यासाठी होणारी जंगलातील खोलवर घुसखोरी प्रसंगी होणाऱ्या शिकारी गावांमधील वाढत्या लोकसंख्येला पोसण्यास कमी पडणाऱ्या शेतजमिनीमुळे होणारी वनजमिनीवरील अतिक्रमणे, मानवी हस्तक्षेपातून लागणारे बनवणवे यांची तुलना ठराविक कालावधीसाठी गाभा क्षेत्रात वाहनांमधून फिरणाऱ्या पर्यटकांशी कशी होऊ शकेल ? तरीही शक्यतोवर पुनर्वसित क्षेत्रात पर्यटन टाळावे असे माझे ठाम मत आहे.

याचिकेला विरोध करण्याऱ्यांची भूमिका पाहू वाघ व वन्यजीव संरक्षणासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव सर्वांनाच माहित आहे. त्यात खाणी, उद्योग वीज, असे प्रकल्प आणण्यात अडचन येत असल्याने हे उद्योगसमूह व्याघ्र प्रकल्पांना या प्रकल्पांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी वन्यजीवप्रेमी राबत आहेत. ते सर्व सर्वप्रथम पर्यटक म्हणून गेले आणि भारावून जाऊनच या क्षेत्राकडे ओढले गेले. वन्यजीवांच्या संवर्धनासाठी समर्थक तयार करायचे असतील तर ते तयार करणाऱ्या उद्योगावर कुऱ्हाड चालवून कसे होणार ? पर्यटन उद्योग हा वन्यजीव संवर्धन.

34. गाभा क्षेत्रातील पर्यटनापेक्षा खालीलपैकी कोणत्या गोष्टी वन्यजीवास जास्त धोकादायक आहेत ?

अ) अनिर्बंध चराई, जळाऊ लाकूड, बांबू, चटया व इतर वनौपज काढण्यासाठी होणारी जंगलातील घुरखोरी

ब) शिकारी व गावातील अपुऱ्या शेतजमीनी

क) वनसंरक्षणामधील लोकांचा अपुरा सहभाग

1) अ, ब  2) अ, क  3) ब, क  4) अ, ब, क

35. वरील उताऱ्याची पार्श्वभूमि काय असू शकेल ?

1) महाराष्ट्र सरकारने गाभा क्षेत्रातील पर्यटनास घातलेली बंदी

2) भारत सरकारने गाभा क्षेत्रातील पर्यटनास घातलेली बंदी

3) सर्वोच्च न्यायालयाने गाभा क्षेत्रातील पर्यटनास घातलेली बंदी

4) वरील सर्व

36. लेखकाचा रोख काय आहे ?

1) पर्यटनामुळे गाभा क्षेत्रातील बांबू व वन्यजीवांना त्रास होतो

2) गाभा क्षेत्रातील मानवी वस्त्यांमुळे वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येते

3) गाभा क्षेत्रातील पर्यटनास परवानगी देऊन सरकारी नियम, नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी करून वन्यजीव संरक्षण केले जाऊ शकते

4) पर्यटक क्रिकेटप्रेमीप्रमाणे जंगलात धुडगुस घालतात

**प्रश्न क्रमांक 37 ते 40 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या .**

कोणत्याही राज्याच्या आरोग्य विभागाला, आपले राज्य कसे सशक्त आणि रोगमुक्त आहे हे सांगण्याची कोणाला घाई असते निदान कागदोपत्री तरी, राज्य सरकारी भासवण्याचा प्रयत्न करीत असतात राज्याचे मूल्यमापन ज्या शिक्षण आणि आरोग्य या समाजाच्या सर्वाधिक घटकांशी संबंधित असलेल्या घटकांच्या आधारे करायचे त्यात महाराष्ट्राने कागदोपत्री जरी यश संपादन केल्याचा दावा केला असला, तरीही वस्तुस्थिती मात्र किती तरी भिन्न आहे. राज्यातील कुष्ठरोग्याबद्दल 'लोकसत्ता' ने दिलेले वृतत या प्रकारावर थेट उजेड पाडणारे आहे. कुष्ठरोग हा संसर्गजन्य असल्याने राज्यात आजही अडीच लाख संशयित रूग्ण असल्याचे तुकत्याच करण्यात आलेल्या सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. तरीही राज्याचा आरोग्य विभाग मात्र डोळयावर कातडे ओढूनच बसला आहे. याचे कारण सुमारे चौदा वर्षापूर्वीच राज्याने कुष्ठरोगाचे समूळ निर्मुलन झाल्याचे जाहीर करून टाकले आहे. एवढेच नव्हे तर त्यासाठी स्थापन केलेल्या स्वतंत्र विभागही बंद करून टाकला आहे. आता कुष्ठरोगाशी संबंधित तज्ज्ञांच्या वैद्यकीय सेवा शासनाच्या आरोग्य सेवा केंद्रामध्ये उपलब्धच नाहीत. अशा डॉक्टरांची अन्यत्र बदली करून आरोग्य खात्याने स्वत: पुरती या विषयाची फाइल भाषनात बांधूत टाकली आहे. कुष्ठरोगामुळे अपंगत्वाच्या प्रमाणात चार टक्क्यांपासून 24 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे आणि शासनाला त्याबद्दल जागही आलेली नाही. केवळ घाई करण्याच्या नादात कागदोपत्री कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन झाल्याचे जाहीर करून महाराष्ट्राच्या आरोग्य खात्याने स्वत:चीच पाठ थोपटून घेतली. प्रत्यक्षात मात्र पहिले पाढे पंचावन्न अशीच स्थिती रस्त्या लागतच्या भिंतीवर 'देवीचा रोगी कळवा, शंभर रूपये मिळवा' अशा घोषणा लिहून शासनाने त्या रोगावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्र संघटनेने पुढाकार घेतला नसता तर पोलिओबाबतही आपण अशीच हार खाल्ली असती. एकूणच सार्वजनिक आरोग्य हा विषय राज्याच्या प्राधान्य यादीत शेवटीशेवटी असतो त्यासाठीची आर्थिक तरतूदही यथातथाच असते. त्यामुळे राज्यातील सगळया सार्वजनिक आरोग्य केंद्रांची अवस्था अतिशय बिकंट झालेली आहे.

शासनाने कुष्ठरोग निर्मुलनासाठी सोळा कोटी रूपयांची तरतूद केली, तेवढाच निधी केंद्राच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातूनही उपलब्ध होतो. संसर्गजन्य रोगांबाबत काळजी घेतली नाही, तर तो जोमाने फैलावतो आणि त्याचा परिणामही दिसू लागतो. मुंबई पुणे यासारख्या शहरांबरोबरच पालघर, नाशिक, रायगड, उस्मानाबाद या भागांतही कुष्ठरोगाची लागण झाल्याचे आढळून आले आहे. अशाही स्थितीत राज्यात असे सर्वेक्षण करण्यासाठी सत्तर हजार सदस्यांच्या शोधपथकाने केलेले काम खरोखरीच कौतुकास्पद आहे. कुष्ठरोगावर तातडीने उपचार केल्यास तो बरा होऊ शकतो, मात्र त्यासाठी शासकीय पातळीवर अधिक उत्साह असण्याची आवश्यकता असते. बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन यांच्यासारख्यांनी या क्षेत्रात आपले आयुष्य झोकून दिले आणि हा प्रश्न समाजासमोर आणला आता गरज आहे. ती प्रत्यक्ष कामाची आरोग्य ही समाजस्वास्थीची गुरूकिल्ली असते, हे वाक्य केवळ भिंतीवर लिहून काही उपयोग नसतो. त्यासाठी प्रत्यक्ष कृतीची गरज असते. शासनाच्या आरोग्य खात्याने हे आव्हान स्वीकारायलाच हवे. अन्यथा अनारोग्यकारी वातावररणात हे राज्य होरपळून निघण्याची शक्यता अधिक.

37. पोलिओ नियंत्रणा बाबत लेखकाने कोणाला श्रेय दिले आहे.

अ) संयुक्त राष्ट्रसंघ

ब) अभियानात स्वयंस्फुर्तीने उतरलेले डॉक्टर

क) शासीय पोलिओ निर्मुलन अभियान

1) अ 2) ब 3) क 4) अ, ब, क

---

38. कुष्ठरोग आणि कुष्ठरोग्यांबाबतच्या समस्या कशा प्रकाश झोतात आल्या ?

अ) बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन यांच्या कार्याने

ब) लोकसत्ताने दिलेल्या वृत्ताने

क) शासकीय अभियानाच्या कार्यामुळे

1) अ 2) ब 3) अ, ब 4) अ, ब, क

---

39. वरील उताऱ्याची मध्यवर्ती संकल्पना कोणती ?

अ) कुष्ठरोगामुळे अपंगत्वाच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे

ब) राज्यातील आरोग्य केंद्राची आवस्था बिकट झाली आहे

क) राज्यातील आरोग्य हि कागदावरच नव्हे तर प्रत्यक्ष गरज आहे ती कृतीची

1) अ 2) अ, क 3) क 4) ब, क

---

40. वरील उताऱ्यात लेखकाने कोणती खंत व्यक्त केली ?

अ) राज्यात आरोग्य विभागासाठी आर्थिक तरतुद कमी असते

ब) प्रत्यक्ष शासकीय पातळीवर उदासिनता दिसून येते

क) राज्यात कुष्ठरोगाचे आडीच लाख संशयित रूग्ण आढळते

1) अ 2) क 3) अ, ब 4) अ, ब, क

---

**Read the following passage and answer the questions from 41 to 42**

There is no field of human endeavour that has been so misunderstood as health. While health which connotes well-being and the absence of illness has a low profile, it is illness representing the failure of health which virtually monopolizes attention because of the fear of pain, disability and death. Event Sushruta has warned that this provides the medical practitioner power over the patient which could be misused

Till recently, patients had implicit faith in their physician whom they loved and respected, not only for his knowledge but also in the total belief that practitioners of this noble profession, guided by ethics, always placed the patient's interest above all other considerations. This rich interpersonal relationship between the physician, patient and family has, barring a few exceptions, prevailed till the recent past, for caring was considered as important as curing. Our indigenous systems of medicine like Ayurveda and yoga have been more concerned with the promotion of the health of both the body and mind and with maintaining a harmonious relationship not just with fellow-beings but with nature itself, of which man is an integral part. Healthy practices like cleanliness, proper diet, exercise and meditation are part of our culture which sustains people even in the prevailing conditions of poverty in rural India and in the unhygienic urban slums. These systems consider disease as an aberration resulting from disturbance of the equilibrium of health, which must be corrected by gentle restoration of this balance through proper diet, medicines and the establishment of mental peace. They also teach the graceful acceptance of old age with its infirmities resulting from the normal degenerative

Process as well as of death which is inevitable.

This is in marked contrast to the western concept of life as a constant struggle against disease, ageing and death which must be fought and conquered with the knowledge and technology derived from their science a science which, with its narrow diseases and provided highly effective technology for their prevention, treatment and control.

This can rightly be claimed as the greatest contribution of western medicine and justifiably termed as 'high' technology. And yet the contribution of this science in the field of non-communicable diseases is remarkably poor despite the far greater inputs in research and treatment for the problems of ageing like cancer, heart diseases, paralytic strokes and arthritis which are the major problems of affluent societies today.

41. Which of the following has been described as the most outstanding benefits of modern medicine ?

1) The real cause and ways of control of communicable diseases

2) Evolution of the concept of harmony between man and nature

3) Special techniques for fighting ageing

1) only 2 and 3 2) Only 1 and 2 3) only 1 4) Only 2

42. Choose the word which is most nearly the same in meaning as the word print d in bold as used in the passage ‘aberration’

1) Observation2) Alternative 3) Deviation 4) Outcome

**Read the following passage and answer the questions from 43 to 45**

Public general hospitals originated in the almshouse infirmaries established as early as colonial times by local governments to care for the poor. Later, in the late eighteenth and early nineteenth centuries, the infirmary separated from the almshouse and became an independent institution supported by local tax money. At the same time, private charity hospitals began to develop. Both private and public hospitals mainly food and shelter for the impoverished sick, since there was little that medicine could actually do to illness, and the middle class was treated at home by private physicians.

Late in the nineteenth century, the private charity hospital began trying to attract middle-class patients. Although the depression of 1890 stimulated the growth of charitable institutions and as expanding urban population became dependent on assistance, there was a decline in private contributions to these organizations which forced them to look to local government for financial support. Since private institution had also lost benefactors, they began to charge patients. In order to attract middle-class patients, private institutions provided services and amenities that distinguished between paying and non-paying patients and made the hospital a desirable place for private physicians to treat their own patients. As paying patients became more necessary to the survival of the private hospital, the public hospitals slowly became the only place for the poor to get treatment. By the end of the nineteenth century, cities were reimbursing private hospitals for their care of indigent patients and the public hospitals remained dependent on the tax dollars.

The advent of private hospital health insurance, which provided middle-class patients with the purchasing power to pay for private hospital services, guaranteed the private hospital a regular source of income. Private hospital restricted themselves to revenue-generating patients, leaving the public hospitals to care for the poor. Although public hospitals continued to provide services for patients whit communicable diseases and outpatient and emergency services, the Blue Cross plans developed around the needs of the private hospitals and the inpatients the served. Thus, reimbursement for ambulatory care has been minimal under most Blue Cross plans, and provision of outpatient care has not been a major function of the private hospital, in part because private patients can afford to pay for the services of private physicians. Additionally, since World War II, there has been a tremendous influx of federal money into private medical school and the hospitals associated with them. Further, large private medical centers with expensive research equipment and programs have attracted the best administrators, physicians, and researchers. As a result of the greater resources available to the private medical centers, public hospital have increasing problems attracting highly qualified research and medical personnel. With the mainstream of health care firmly established in the private medical sector, the public hospital has become a “dumping ground”

43. The author’s primary concern is to

1) describe the financial structure of the healthcare industry

2) demonstrate the importance of government support for health-care institutions

3) criticize wealthy institutions for refusing to provide services to the poor

4) identify the historical causes of the division between private and public hospital

44. According to the passage, the very first private hospitals

1) developed from almshouse infirmaries

2) provided better care than public infirmaries

3) were established mainly to service the poor

4) were supported by government revenues

45. Which of the following is the antonym of the word tremendous?

1) Bantam 2) Galactic 3) Leviathan 4) Humongous

46. दक्षिणोत्तर मार्गावर a आणि b याची घरे एकमेकांसमोर आहेत. a चे घर पश्चिम बाजूला आहे. b घरातून बाहेर पडतो, डावीकडे वळतो 5 कि.मी. चा प्रवास करून पुन्हा उजवीकडे वळतो आणि 5 कि.मी. प्रवास करून d च्या घरासमोर पोहोचतो. b सुध्दा अगदी तसेच करतो आणि c च्या घरासमोर पोहोचतो. या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

1) c आणि d एकाच रस्त्यावर राहतात

2) c चे घर दक्षिणाभिमुख आहे

3) c आणि d यांच्या घरांतील अंतर 20 कि.मी. पेक्षा कमी आहे

4) a, b आणि c यांपैकी कोणतेही विधान बरोबर नाही

47. 5 पैसे, 10 पैसे व 25 पैसे यांची प्रत्येकी अणुक्रमे 3:2:1 या प्रमाणात नाणी घेतल्यास 24 रूपयात 5 पैशांची किती नाणी मिळतील ?

1) 60 2) 80 3) 120 4) 40

48. विधाने : 1) काही ट्रेन कार आहेत
2) काही कार नद्या आहेत
3) काही रस्ते नद्या आहेत

निष्कर्ष अ) काही नद्या ट्रेन आहेत
ब) काही रस्ते ट्रेन आहेत
क) काही रस्ते कार आहेत
ड) काही नद्या रस्ते आहेत

1) फक्त ब या क समर्थन करते 2) फक्त अ व ब समर्थन करते
3) ड समर्थन करते 4) यापैकी नाही

---

49. काजल, मिना, गोकुर्णा, सुचिता, अक्षदा या पाच मैत्रिणी आहेत. त्यांनी निळा, लाल, पिवळा, हिरवा, पांढरा या रंगाचे ड्रेस घातले आहे. सर्वात उंच असणारीने पांढरा तर सर्वात सर्वात कमी उंचीच्या मैत्रिणीने पिवळा ड्रेस घातला आहे. अक्षदाने निळा किंवा लाल ड्रेस घातलेला नाही, मिनाच्या ड्रेसचा रंग हिरवा आहे आणि ती किमान दोघींपेक्षा उंच आहे. अक्षदाच्या ड्रेसचा रंग निळा आहे आणि ती किमान दोघींपेक्षा उंचीने कमी आहे. लाल रंगाचा ड्रेस घातलेल्या मैत्रिणीपेक्षा फक्त सुचिता उंच आहे. काजलचा ड्रेस लाल किंवा पांढरा नाही तर गोकुर्णाबाबतचे कोणते विधान योग्य आहे ?

1) ती उंचीने सर्वात कमी आहे आणि तिचा ड्रेस पिवळया रंगाचा आहे
2) ती किमान तिघींपेक्षा उंच आहे आणि तिचा ड्रेस पांढऱ्या रंगाचा आहे
3) ती मिनापेक्षा उंच आहे आणि तिने लाल रंगाचा ड्रेस घातलेला आहे
4) ती काजलपेक्षा कमी उंच आहे आणि तिने पांढरा ड्रेस घातलेला आहे

---

50. गीता व विजय यांच्या सध्याच्या वयाचे गुणोत्तर 6:7 आहे 8 वर्षानंतर त्यांच्या वयाचे गुणोत्तर 8:9 होईल, तर विजयचे सध्याचे वय किती ?

1) 24 2) 26 3) 28 4) 30

---

51. खालील उदाहरणांमध्ये दिलेल्या प्रतिकांचा उपयोग दिलेल्या विधानांच्या अर्थासाठी वापरण्यात आलेली आहेत.

$E \propto F$ म्हणजे E हा F पेक्षा मोठा नाही व लहानही नाही
$E \cap F$ म्हणजे E हा F पेक्षा मोठा आहे किंवा समान आहे
E # F म्हणजेच E हा F पेक्षा लहान आहे किंवा समान आहे
$E \sim F$ म्हणजेच E हा F पेक्षा मोठा आहे
E / F म्हणजेच E हा F पेक्षा लहान आहे

विधान : $N \cap T, \quad T \propto P, \quad P \sim B$

निष्कर्ष : i) P % N ii) B @ T

1) जर फक्त निष्कर्ष I सत्य 2) जर फक्त निष्कर्ष II सत्य
3) जर निष्कर्ष I व II असत्य 4) जर निष्कर्ष I व II दोन्ही सत्य

---

52. पाच कोर्सेस G, H, I, J, K हे प्रत्येकी एक महिन्याच्या कालावधीचे असून जानेवारीपासून मे पर्यंत A, B, C, D, E ह्या प्राध्यापकाकडून शिकविले जातात


अ) A प्राध्यापक H कोर्स शिकवतात परंतु एप्रिल किंवा मे महिना सोडून
ब) B प्राध्यापक G कोर्स मार्च महिन्यात शिकवतात
क) C प्राध्यापक हे जानेवारी महिन्यात शिकवतात परंतु ते I किंवा J कोर्स शिकवत नाहीत

प्रश्न : H कोर्स नंतर कोणत्या प्राध्यापकांचा कोर्स सुरू होतो ?

1) E 2) B 3) A 4) D

---

53. खालील दिलेल्या कागदाची सांगितल्याप्रमाणे घडी घालून त्याला विशिष्ट आकाराचे छिद्र केले असता ती घडी उघडल्यानंतर कोणत्या प्रकारची प्रतिमा निर्माण होईल ते ओळखा



---

54. X हा Y चा भाऊ आहे पण Y हा X चा भाऊ नाही. Y ची आई A आहे. X चे वडिल B आहेत व X चे काका C आहेत. तर C व Y यांचे नाते सांगा ?

1) बहिण - भाऊ 2) काका - पुतणी 3) मामा - भाचा 4) वडिल - मुलगा

55. एका व्यासपीठावर O, P, Q, R या 4 संघांचे मालक बसले आहेत. त्यांच्यासोबत एक व्यक्ती असून ती समन्वयक आहे. त्यांचे नावे विनाक्रम अदानी, मोदानी, अंबानी, रब्बानी व मस्तानी आहे. अशाप्रकारे हे 5 व्यक्ती पुढीलप्रमाणे बसले आहेत.

1) समन्वय व्यक्ती मध्यभागीच बसते
2) O संघाचे मालक Q मालकाशेजारी नाही
3) मोदानी हे R संघाचे मालक आहेत
4) R व Q चे मालक समन्वयकाच्या बाजूला बसतात
5) अदानी हे समन्वयक नाहीत मात्र ते समन्वयकाच्या शेजारी बसतात व ते R संघाचे मालक नाहीत
6) अंबानी हे एका टोकाला बसले आहेत
7) P चे मालक मस्तानी आहेत
8) समन्वयक हे अंबानी व मस्तानी यांच्या शेजारी नाहीत
9) रब्बानी हे कोणत्याच संघाचे मालक नाहीत

प्रश्न : R संघाचे मालक कोण व अंबानी हे कोणत्या संघाचे मालक आहेत ?

1) R संघाचे मालक अदानी व अंबानी हे P संघाचे मालक आहेत
2) R संघाचे मालक मोदानी व अंबानी हे P संघाचे मालक आहेत
3) R संघाचे मालक मोदानी व अंबानी हे Q संघाचे मालक आहेत
4) वरीलपैकी एकही नाही

---

56. 1031019 : 12144130 : : 34364352 : ?

1) 45383947 2) 45475463 3) 45373039 4) 45526154

---

57. विधान : विमान कंपनी ए ने तात्काळ परिणाम म्हणून प्रवासी भाडयात 15% वाढ करण्याचा निर्णय घेतला

गृहीतके :

अ) प्रवासी भाडे वाढले तरी किमान कंपनी ए च्या तिकीटांच्या मागणीत काही फरक पडणार नाही
ब) इतर विमान कंपन्याही प्रवासी भाडे वाढविण्याची शक्यता आहे

1) दोन्ही गृहितके सूचित होतात 2) फक्त गृहितक ब सूचित होते
3) दोन्ही गृहितके सूचित होत नाहीत 4) फक्त गृहतिक अ सूचित होते

---

58.


**माहिती** : ℓ C M @ N £ T २ Y ६ S ⋉ Q $ ७ * W # Z ३ U E % A ४

**प्रश्न** : CMA, N£E, २Y३, ?

अ) £Q# ब) S⋉# क) S६⋉ ड) SaZ

---

59. खालील आकृतीत किती त्रिकोण आणि चौकोन किती आहेत ते मोजा ?



1) 20 त्रिकोन, 8 चौकोन 2) 18 त्रिकोन, 8 चौकोन 3) 21 त्रिकोन, 7 चौकोन 4) 22 त्रिकोन, 7 चौकोन

---

60. एका फॅन्सी ड्रेस स्पर्धेमध्ये स्पर्धकांना त्याच्या व्यवसायानुरूप ड्रेस परिधान करून येणास सांगितले आहे. मि. विरेश, मिसेस चव्हाण, मिसेस योगिता, मि. मनोज आणि मि. सागर हे स्पर्धक आहेत. त्यांचा पोशाख हा पान, पेन, चाकू, कॅमेरातील रोल आणि स्टेथोस्कॉप असा आहे. त्यांचा व्यवसाय जसे - फोटोग्राफर, माळी, डॉक्टर, शिक्षक आणि स्वयंपाकी असा आहे.


अ) मि. विरेश हे शिक्षक आहेत
ब) मिसेस चव्हाण किंवा मिसेस योगिता ह्यांपैकी कुणीही चाकूचा ड्रेस घातला नाही
क) कोणताही पुरूष स्पर्धक हा डॉक्टर नाही
ड) मि. मनोज यांनी कॅमेरा रोल ड्रेस घातला आहे
इ) मिसेस योगिता ह्या माळी आहेत

प्रश्न - सागरचा व्यवसाय कोणता असेल ?

1) स्वयंपाकी 2) माळी 3) डॉक्टर 4) शिक्षक

---

61. पुढील आकृतीत दिलेल्या माहितीवरून उत्तरे निवडा
तृप्ती व संगीता यांचे वार्षिक खर्च पुढीलप्रमाणे आहेत




प्रश्न - तृप्तीचा पगार 16600 व संगीताचा 20000 असेत तर किराणा मालावर खर्च होणारी एकूण रक्कम किती ?

1) 13150 2) 12750 3) 10500 4) 12000

62. COMMITTEE या शब्दातील सर्व अक्षरे वापरून किती शब्द तयार होतील ज्यामध्ये चार स्वर एकत्र येणार नाहीत ?

1) 2160 2) 45360 3) 1260 4) 43200

63. खालील माहिती काळजीपूर्वक वाचा व त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तर द्या
सलमान, शाहरूख, आमीर, अभिषेक, रणवीर, अजय, अक्षय हे सात मित्र 1st year, 2nd year, 3rd year मध्ये अशाप्रकारे आहेत की प्रत्येक वर्गात कमीत कमी 2 मित्र असतील प्रत्येकाचे इतिहास, भूगोल, इंग्रजी, मराठी, हिंदी, गणित आणि राज्यशास्त हे वेगवेगळे आवडीचे विषय आहेत. पण याच क्रमाने असतील असे नाही

अ) सलमानला गणित विषय आवडतो आणि तो 1st year ला आणखी एका मित्रासोबत शिकतो ज्यास मराठी हा विषय आवडतो

ब) अभिषेक 2nd year आणखी एका मित्रासोबत शिकतो ज्याला भूगोल हा विषय आवडतो. अजयल हिंदी विषय आवडत नाही

क) अक्षय त्याच्या अन्य दोन मित्रासोबत शिकतो. ज्यांना फक्त भाषा हे विषय आवडतात (भाषा विषय - मराठी, इंग्रजी, हिंदी)

ड) रणवीरला भाषा विषय आवडत नाही आणि तो केवळ एका मित्रासोबत शिकतो


इ) इतिहास आवडणारा विद्यार्थी 1st year किंवा 2nd year मध्ये शिकत नाही


फ) आमीरला इंग्रजी, हिंदी किंवा भूगोल आवडत नाही

प्रश्न : भाषा विषय न आवडणारे विद्यार्थी कोणते ?

1) अभिषेक, शाहरूख, रणवीर 2) सलमान, शाहरूख, रणवीर
3) रणवीर, अभिषेक, अक्षय 4) सलमान, अभिषेक, अजय

64. प्रश्नचिन्हा ऐवजी ठेवण्यासाठी योग्य प्रतिमा पर्यायांतून निवडा




65. दिलेली मांडणीचा अभ्यास करा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आदान : | 51 | pour | 32 | start | now | 23 | 46 | house |
| पायरी I : | 23 | 51 | pour | 32 | start | now | 46 | house |
| पायरी II : | 23 | start | 51 | pour | 32 | now | 46 | house |
| पायरी III : | 23 | start | 32 | 51 | pour | now | 46 | house |
| पायरी IV : | 23 | start | 32 | pour | 51 | now | 46 | house |
| पायरी V : | 23 | start | 32 | pour | 46 | 51 | now | house |
| पायरी VI : | 23 | start | 32 | pour | 46 | now | 51 | house |

प्रश्न : आदान : 72 59 37 goal for picnic 24 journey तर व्यवस्थापन पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त किती पायऱ्या लागतील ?

1) 3 2) 4 3) 5 4) 6


66. अक्षयला आईने 100 रू. दिले व पेरू आणि सफरचंद आणण्यास सांगितले. बाजार भावानुसार अमितने 3 पेरू व 6 सफरचंद घेतल्यास त्याच्याकडे काहीही रक्कम शिल्लक राहत परंतु 3 सफरचंद व 6 पेरू घेतल्यास 20% रक्कम कमी पडते. जर त्याला पेरू व सफरचंदांची संख्या समान ठेवायची असेल तर त्याने किंती सफरचंद विकत घ्यायला हवेत ?


1) 4 2) 5 3) 6 4) 7

67. एक घडयाळ जे प्रत्ये 3 मिनिटात 5 सेकंद पुढे जाते, ते सकाळी 7 वाजता बरोबर लावले आहे. जर त्याच दिवशी दुपारी जर घडयाळ 4 वाजून 15 मिनिटांची वेळ दाखवत असेल तर बरोबर वेळ काय असेल ?

1) 4 वाजून 2 मि. 2) दुपारचे 4 3) 3 वाजून 58 मि. 4) 3 वाजून 59 मि.

68. खालील प्रश्नांमध्ये सुरूवातीस एक घडी न घातलेला पारदर्शक कागद दिलेला ओ. त्यावर काही विशिष्ट आकार काढलेल्या आहे. त्या कागदाला आकृतीत दाखविल्याप्रमाणे बिंदू रेषेवर घडी घातल्यास तो कसा दिसेल ते पर्यायातून शोधा





अ ब क ड

---

69. चार विद्यार्थ्यांची उंची Q, R, S, T आहे. 2R = Q + T, 2Q = R + S, 2S = Q तर त्यांच्या उंचीनुसार चढता व उतरता क्रम लावा ?

1) R T Q S - T R Q S  2) Q R T S - T Q S R
3) S Q R T - T R Q S  4) माहिती अपूर्ण

---

70. पुढील दोन्ही तक्त्यांचा (MATRIX) वापर करा व प्रश्नांचे उत्तरे द्या प्रथम Rows व नंतर Coloumn असा क्रम ठेवा

Matrix I

| | 0 | 1 | 2 | 2 | 4 |
|---|---|---|---|---|---|
| 0 | A | E | I | O | U |
| 1 | I | E | A | U | O |
| 2 | E | A | O | I | U |
| 3 | O | I | U | E | A |
| 4 | U | O | E | A | I |

Matrix II

| | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|
| 5 | R | K | M | P | Q |
| 6 | K | Q | R | M | P |
| 7 | M | P | K | Q | R |
| 8 | Q | R | P | K | M |
| 9 | P | M | K | Q | R |

प्रश्न : ORPU = ?

1) 30, 86, 87, 95  2) 41, 99, 40, 04  3) 14, 79, 87, 40  4) 14, 69, 76, 13

---

71. वैभव रोज 5 तास काम करून एक काम 4 दिवसात पूर्ण करतो. कॅलास रोज 6 तास काम करून 3 दिवसात काम पूर्ण करतो. वैभव 4 तास काम करून व कैलास 3 तास काम करून दोघेही एकच काम करतील तर ते किती दिवसात पूर्ण होईल ?

1) 3 दिवस  2) 30/11 दिवस  3) 27/11 दिवस  4) 2 दिवस

---

72. पुढील माहितीवरून प्रश्नाचे योग्य उत्तर द्या

G, H, I, J, K, L व M या 7 व्यक्ती वेगवेगळया मजल्यावर राहतात पण या क्रमाने नव्हे. सर्वात तळाचा मजला 1 क्रमांकाचा असून त्यावरील क्रमांक 2 आणि सर्वात वरचा मजला हा 7 क्रमांकाचा आहे. प्रत्येक व्यक्तीचा पगार वेगवेगळा आहे. त्यांचे पगार 20000 रू., 15000 रू., 10000 रू, 25000 रू. 30000 रू, 35000 रू. व 40000 रूण् आहेत पण या क्रमाने नव्हे 20000 रू. पगार असणारी व्यक्ती ही 40000 रू. पगार असणाऱ्या व्यक्तीच्या लगोलग वरच्या मजल्यावर राहते. H व K यांच्या दरम्यान केवळ एक व्यक्ती राहते. H व K या दरम्यान केवळ एक व्यक्ती राहते. H व K च्या वर कोणत्याही एका मजल्यावर राहतो. I किंवा G चा पगार 25000 रू. नाही. K चा पगार 10000 रू. नाही. G च्या मजल्याचा क्रमांक विषम आहे पण तो क्रमांक 3 नाही. 30000 रू. पगार असलेली व्यक्ती G च्या लगेच वरच्या मजल्यावर राहते. G व ज्याचा पगार 10000 रू. आहे ती व्यक्ती यांच्या दरम्यान केवळ दोन व्यक्ती राहतात. जिचा पगार 15000 रू. आहे. ती व्यक्ती J च्या मजल्यावर राहतो त्याचा कोणत्याही वरील विषम क्रमांकाच्या मजल्यावर राहते. J व ज्याचा पगार मजल्यावर राहते. L ला 10000 रू. पगार आहे.

प्रश्न : खालीलपैकी योग्य जोडी कोणती ?

1) L - 20000  2) I - 30000  3) H - 35000  4) G - 15000

---

73. SHADI हा शब्द एका सांकेतिक लिपीत TJDHN असा लिहीतात तर ENGAGEMENT शब्द कसा लिहीणार?

1) FPJELKTNWD  2) FPLKTJEMWD  3) FPLEJKTMWD  4) FPJELKKTMWD

---

74. 2001 साली एप्रिल महिन्यामध्ये कोण्कोणत्या तारखेला बुधवार आला होता ?

1) 1, 8, 15, 22, 29  2) 2, 9, 16, 23, 30  3) 3, 10, 17, 24  4) 4, 11, 18, 25

---

75. पुढील निकषांचे निरीक्षण करून योग्य पर्याय निवडा

| | |
|---|---|
| RAINBOW | swfngtb |
| FAN | fsk |
| COSTUME | jyxtzhr |
| STATION | yfxytsn |
| STOOL | tqtyx |
| POLISH | tuqxhm |
| BUS | xgz |
| GLITTER | yylqwns |
| BAT | ygf |

प्रश्न : COSMIC

1) txtrnt 2) xrnthq 3) nhxrtn 4) htxrnh

76. तुम्ही जिल्हा न्यायालयात न्यायाधीश पदावर कार्यरत आहेत. त्याच न्यायालयात वकीली करण्याऱ्या श्री. जोशी या वकीलांच्या मुलाचे दुसऱ्या गावात लग्न असून त्याप्रित्यर्थ तुम्हास त्यांनी आग्रहाचे निमंत्रण दिले आहे. श्री. जोशी हे सुविख्यात वकील असून आजपर्यंत एकाही प्रकरणात त्यांना हार मानावी लागलेली नाही. लग्न समारंभादरम्यान आयोजित सत्कार समारंभात श्री. जोशी हे त्यांचे सहकारी वकील तसेच त्यांच्या न्यायालयात कार्यरत न्यायाधीश यांचा शाल पुष्पहार व महागडी भेटवस्तू देऊन सत्कार करीत आहेत. मात्र अशी भेटवस्तू स्वीकारणे तुमच्या तत्वात बसत नाही. तसेच न्यायिक शिस्तीच्या आणि नैतिकतेच्या दृष्टीने विचार करता ते अयोग्य आहे असे तुमचे मत आहे. अशा वेळी तुमच्या नावाची घोषणा झाली असता तुम्ही काय करणे उचित ठरेल?

1) लग्न समारंभ हा खाजगी स्वरूपाचा कार्यक्रम असल्यामळे तेथे तुम्ही न्यायाधीश नसून एक अतिथी आहात त्यामुळे तुम्ही तो सत्कार स्वीकारावा
2) तुमच्या नावाची घोषणा करणे अपमानजनक वाटल्यामुळे तुम्ही त्या स्थळाचा त्याग करावा
3) स्वस्थानी उभे राहूनच संबंधिताचे आभार मानावेत आणि सत्कार स्वीकारण्यास विनम्र नकार द्यावा
4) सत्काराच्या ठिकाणी जाऊन ध्वनीक्षेपावरून अशा प्रकारे न्यायाधीशांचे सत्कार करणे हे गैरकृत्य असून त्याबद्दल यजमानांचा व सत्कार स्वीकारणाऱ्या न्यायाधीशांची धि:कार करावा.

77. दिल्लीतील परवानाधारक प्रवासी टॅक्सीव्दारे तुम्ही (दुसऱ्या राज्यातल) जवळच्या शहरात जात असताना तुमचा टॅक्सी चालक तुम्हास सूचीत करतो की, त्याच्याकडे या शहरात टॅक्सी चालविण्याचा परवाना नसल्यामुळे तो येथील परिवहन कार्यालयापुढे थांबून प्रतिदिनी चाळीस रूपये याप्रमाणे निर्धारित शुल्क भरेल. काऊंटरवर शुल्क जमा करताना तेथील परिवहन लिपीक जास्तीचे पन्नास रूपये घेत असून त्याची कुठलीही पावती देत नसल्याचे तुमच्या लक्षात आले आहे. तुम्ही तुमच्या बैठकीसाठी घाईत आहात. या परिस्थितीत तुम्ही काय कराल ?

1) काऊंटरवर जाऊन लिपीकाने अवैधरित्या घेतलेली रक्कम परत मागाल
2) ही बाब टॅक्सी चालक आणि कर अधिकाऱ्यांशी संबंधित असल्यामुळे कुठलाही हस्तक्षेप करणार नाहीत
3) घटनेची नोंद घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना त्याचा अहवाल द्याल
4) यास एक साधारण बाब समजून विसरून जाल

78. राघव हा सांगली जिल्ह्यातल एक सधन शेतकरी आहे. त्याच्या शेतात टोमॅटोचे पीक निघते जिल्ह्यातल टोमॅटो सॉस बनविणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीने राघवशी संपर्क साधून त्याने कंपनीस पिकाची थेट विक्री केल्यास त्या बदल्यात त्यास उत्तम मोबदला देण्याची हमी दिली आहे. हा मोबदला त्यास संघटनेकडून मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा दीडपट आहे. अशा परिस्थितीत राघवने खालीलपैकी कोणता पर्याय निवडणे सयुक्तिक ठरेल ?

1) राघव हा शेती नफ्यासाठी करीत असल्याने त्यास कंपनीकडून अधिक फायदा होणार असल्यामुळे त्याने सर्व पीक कंपनीस विक्री करावे
2) त्याने अर्धे पीक कंपनीस तर अर्धे पीक आपल्या संघटनेस विकावे
3) राघव विक्री संघटनेचा सदस्य असल्यामुळे त्याने कंपनीचा प्रस्ताव धुडकावून लावावा
4) त्याने आपल्या संघटनेच्या बैठकीत हा प्रस्ताव सर्व सदस्यांसमोर मांडून सदस्यांनी कंपनीस थेट विक्री केल्याससर्वांनाच अधिक फायदा मिळविता येईल यासाठी सर्व सहमती साध्य करण्याचा प्रयत्न करावा

79. तुम्ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात वरिष्ठ अधिकारी आहात विभागामार्फत महानगरपालिकांच्या क्षेत्रात बांधलेल्या उत्कृष्ट 'फ्लाय ओव्हर ब्रिज' ला पुरस्कार द्यायचा आहे. अंतिम यादीत असलेल्या तीन पैकी एका मनपाच्या हद्दीतील ब्रिज (उड्डाण पुल) पुरस्कार प्रदान करण्यासाठी नेमलेल्या निवड समितीचे तुम्ही प्रमुख आहेत. तुम्ही कोणाची निवड कराल ?

| 'अ' मनपा हद्दीतील उड्डाणपूल | 'ब' मनपा हद्दीतील उड्डाणपूल | 'क' मनपा हद्दीतील उड्डाणपूल |
|---|---|---|
| 1) शांधाय मॉडेलनुसार बनविलेला<br>2) अत्याधुनिक तंत्राचा वापर केलेला<br>3) चारपदरी<br>4) परंतु अवघड, बाकदार वळणे<br>5) पावसाच्या पाण्याचा व्यवस्थित निचरा नाही | 1) गजबलेल्या ठिकाणी व कमीतकमी जागेचा वापर करून बांधलेला<br>2) सहा मार्गांना जोडणारा<br>3) दुपदरी<br>4) पदपथाची सुविधा असणारा<br>5) धोकादायक, अपघाती वळण किंवा जागा नाही<br>6) पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा केलेला | 1) शहराच्या चारी दिशांना जोडणारा<br>2) लहान व मोठया वाहनांसाठी वेगळी लेण असणारा<br>3) विशिष्ट तंत्रामुळे दिर्घकाळ खड्डेविरहित राहण्याची हमी देणारा |

1) शांघाय मॉडेलला तुम्ही पसंती द्या कारण उत्कृष्ट तंत्रामुळे शासनानेच या मॉडेलला पसंती दर्शविली आहे
2) 'ब' तुम्हाला योग्य वाटेल कारण गजबजलेल्या ठिकाणी असलेल्या या उड्डाणपूलामुळे वाहतूक समस्येवर रामबाण उपाय निर्माण झाला आहे. पदपथामुळे लोकांची चांगली सोय झाली आहे
3) 'क' हा चारी दिशांना जोडतो म्हणजे त्यास अवघड वळण नाही. कमी धोकादायक आहे. वेगवेगळया वाहनांसाठी वेगळी लेन हा मुद्दा चांगला वाटल खड्डे बुजविण्याचे काम टाळणारा हा उड्डाणपूल असल्यामळे 'क' ला पसंती दर्शवाल
4) काही बांधकाम तज्ज्ञांचा विचार, सल्ला घ्याल, तसेच अ, ब, क पैकी कमीत कमी खर्चात कोणता उड्डाणपूल बांधून झाला हा मुद्दाही ध्यानात घ्याल

80. एका लोकप्रिय दैनिकामध्ये तुम्ही स्तंभालेख करीत आहात. तुमच्या स्तंभाचा विषय समाविष्ट असलेले एक पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले असून ते तुम्हाला कोणीतरी भेट म्हणून दिले आहे. पुस्तक चाळताना त्यामध्ये तुमचा स्तंभातील काही उतारे वापरण्यात आल्याचे तुमच्या लक्षात आले आहे. तुम्ही

1) बौदधिक संपदा कायद्याखाली लेखक व प्रकाशक यांचेवर कायदेशीर कारवाई कराल
2) पुस्तकाच्या पुढील आवृत्तीमध्ये सदर उताऱ्यांचे लेखक म्हणून तुमचा उल्लेख करण्याची मागणी प्रकाशक व लेखक यांचकडे कराल
3) सदर उतारे वापरण्याबद्दल त्याचे योग्य ते मानधन देण्याची लेखी मागणी प्रकाशकाकडे कराल
4) अशा प्रकारे विनापरवानगी तुमच्या लेखनाचा वापर केल्याबाबत तुमची नाराजगी लेखक व प्रकाशकास अप्रत्यक्षपणे कळवाल